रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१२
www.ramprahar.com
◆ रविवार, ३१ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पोलादपूरमध्ये अपघातात मायलेकी ठार/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
आयपीएलमध्ये आज गुजरात वि. बंगळुरू अंतिम लढत/८

## 'आयएसआय'च्या नऊ एजंट्सना अटक, शस्त्रसाठा जप्त



**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत पोलिसांनी एका मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उधळून लावत पाकिस्तानी गुप्तचर संघटना 'आयएसआय'च्या नऊ एजंट्सना अटक केली आहे. दिल्ली आणि मुंबईसह देशातील मोठ्या शहरांमध्ये दहशतवादी हल्ला करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. अटक करण्यात आलेले संशयित दहशतवादी दिल्ली, मुंबई आणि पंजाबमधील रहिवासी आहेत, तर काही जण परदेशी नागरिकदेखील आहेत. त्यांचे अंडरवर्ल्डशी कनेक्शन असल्याचे समोर आले आहे. संशयित दहशतवाद्यांकडून पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त केला आहे. त्याचबरोबर पाकिस्तानमधून आणलेली स्फोटके, ग्रेनेड्सही जप्त केली आहेत. वृत्तसंस्था एएनआयने दिलेल्या बातमीनुसार हे नेटवर्क दाऊद इब्राहिमशी निगडित गुन्हेगारी जगताशी संबंधित होते.

# पनवेल जॉब ड्राईव्हला उत्स्फूर्त प्रतिसाद

## युवक-युवतींना मिळाल्या रोजगाराच्या संधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित विविध सामाजिक उपक्रमांच्या मालिकेंतर्गत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि एकलव्य फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला पनवेल जॉब ड्राईव्ह २०२६ हा भव्य रोजगार मेळावा शनिवारी (दि.३०) उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी झाला. शेकडो युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यात सहभाग नोंदवून रोजगाराच्या संधींचा लाभ घेतला.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या रोजगार मेळाव्याला सकाळपासूनच युवक-युवतींची मोठी गर्दी झाली होती. रोजगाराच्या शोधात असलेल्या उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि अनुभव यानुसार विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधत मुलाखती दिल्या.



या मेळाव्यात बँकिंग, माहिती तंत्रज्ञान (आयटी), आयटीईएस, रिटेल, ग्राहक सेवा, फायनान्स, विमा, बॅक ऑफिस, मानव संसाधन (एचआर) आदी विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. अनेक कंपन्यांनी जागेवरच प्राथमिक मुलाखती घेत पात्र उमेदवारांची निवड प्रक्रिया सुरू केली. त्यामुळे सहभागी युवक-युवतींना रोजगारासाठी थेट व्यासपीठ उपलब्ध झाले. तरुणाईला रोजगाराच्या संधी त्यांच्या परिसरातच उपलब्ध करून देणे, उद्योग क्षेत्र आणि रोजगार शोधणारे युवक यांच्यातील दरी कमी करणे तसेच कौशल्याधारित रोजगाराला चालना देणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. त्यास प्रतिसाद देत शेकडो युवक-युवतींनी उत्साहाने सहभाग घेतला.

या रोजगार मेळाव्यात ३आय इन्फोटेक लि., रिलायन्स, टीमलीज सर्व्हिस, ओटू बीज सर्व्हिसेस, यशस्वी ग्रुप, एस.एच. केळकर लि., सुधरलँड, महिंद्रा इंटर्ग्रेटेड बिझनेस सोल्युशन, एचडीएफसी बँक, एनआयआयटी फाऊंडेशन, टाटा कन्सल्टी सर्व्हिसेस, डिजीटाईड सोल्युशन, एचडीबी फायनान्शल सर्व्हिसेस, टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स, भारती एअरटेल, वेस्टसाईड ट्रेंट लि., एसबीआय कॅप सिक्युरिटीज आदी कंपन्यांचा सहभाग होता. कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, संवाद कौशल्य, तांत्रिक ज्ञान आणि अनुभवाच्या आधारे मुलाखती घेतल्या. **(पान २ वर..)**

## माजी मंत्री प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीचा रणसंग्राम ऐन रंगात आलेला असतानाच महाविकास आघाडीला अहिल्यानगर जिल्ह्यात मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी अखेर 'कमळ' हाती घेतले आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी खासदार सुजय विखे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तनपुरे यांनी राहुरीचे नगराध्यक्ष आणि समर्थकांसह शनिवारी (दि.३०) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीमधून तनपुरे यांनी माघार घेतली होती. त्यामुळे भाजपचे अक्षय कर्डिले यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला. तेव्हापासून ते भाजपच्या वाटेवर असल्याच्या चर्चा होत्या. त्यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. मतदारसंघातील प्रश्न मार्गी लागावे यासाठी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे तनपुरे यांनी यावेळी सांगितले.



खारघरच्या इस्कॉन मंदिरात कर्करुग्णांसाठी उपक्रम

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून एक कोटींची भरीव मदत जाहीर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील इस्कॉन मंदिरात कर्करोगग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक, भावनिक व आध्यात्मिक आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट आणि कृष्णा संजीवनी द डिव्हाईन म्युझिक या उपक्रमाचा शुभारंभ शनिवारी (दि.३०) करण्यात आला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या सेवाभावी उपक्रमासाठी एक कोटी रुपयांची भरीव मदत जाहीर केली.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल जिष्णू देव वर्मा, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, इस्कॉन नवी मुंबईचे मंदिर अध्यक्ष डॉ. सूर दास, भक्तिवेदांत कॉलेजचे संचालक डॉ. व्ही.सेवक दास, कॅल्विन सेउंगवॉन यी, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयुक्त मंगेश चितळे, डॉ. विक्रम गोटा, डॉ. अमित जोशी, डॉ. रजनीश कामत, डॉ. अविनाश टिप्पणी आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## पुणे दारूबळींची संख्या २२वर

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे टप्प्याटप्प्याने २१ जणांचा बळी गेला. त्यानंतर या दारूच्या मुख्य पुरवठ्याचा स्रोत असलेल्या उरुळीकांचन येथील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. त्यामुळे मृतांचा एकूण आकडा २२वर पोहचला आहे.


राजू उमेश अवचरे (३८, रा.पांढरस्थळ, उरुळीकांचन) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला शुक्रवारी सकाळपासून एका खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. विषारी दारू सेवनानेच त्याचा मृत्यू झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

## नवीन पनवेलमध्ये मंगळवारी महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी व आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त सेवाभावी संस्था श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या विद्यमाने ३० वर्षांवरील महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व तपासणी शिबिर तसेच सर्वांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर मंगळवार दि. २ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात होणार आहे.

शिबिरामध्ये विशेषतः गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि मुखाचा कर्करोग याबाबत जनजागृती व मोफत तपासणी केली जाणार आहे. याशिवाय बीएमआय, रक्तदाब, रक्तातील साखर, डोळ्यांची तपासणी, ईसीजी, रक्त तपासणी, क्षयरोग तपासणी, छातीचा एक्स-रे, फॅमिली प्लॅनिंग सल्ला आदी सुविधा उपलब्ध असतील तसेच विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून स्त्रीरोग, अस्थिरोग, बालरोग, नेत्ररोग आणि दंतचिकित्साविषयक मार्गदर्शन दिले जाणार असून एचपीव्ही लसीकरणाबाबतही माहिती देण्यात येणार आहे. त्याचबरोबर आयुष्यमान आणि आभा कार्ड काढण्याची सुविधा यावेळी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी डॉ. अस्मिता घरत (८४५४००९७६६) आणि गौरव कांडपिळे (९९२०८६८००८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# एकीकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना साकार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती; २८ टन गॅसची निर्मिती

**नागपूर : प्रतिनिधी**

देशातील पहिला एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प भांडेवाडी येथे खासगी गुंतवणुकीतून साकारत असून या प्रकल्पामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होऊन २८ टन प्रतिदिन गॅसची निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. ३०) येथे दिली.

भांडेवाडी परिसरात केवा सुस बडे या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहातर्फे शहरात दररोज निर्माण होणाऱ्या १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रकल्पाची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीना हातीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दानी, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष



प्यारे खान, महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटणकर, केवा सुसबडे, प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर, फायनान्स डायरेक्टर विनोद तणदोन, उपाध्यक्ष विजय चिपळूणकर तसेच लोकप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्र तीन टप्प्यात पूर्ण होणार असून येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत शहरातील १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर संपूर्ण प्रक्रिया अत्यंत आधुनिक पद्धतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ओला व सुका कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रक्रियेनंतर बायोगॅस, कंपोस्ट खत तसेच सुक्या कचऱ्यापासून पावर प्लेट्स इंधन तयार होणार आहे. भारतातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे ३० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून गॅस विक्रीतून महानगरपालिकेला दरवर्षी १५ लाख रुपयांची रॉयल्टीही मिळणार आहे. पर्यावरणपूरक या प्रकल्पासाठी प्रशासनातर्फे आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केल्या आहेत.

एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे पुढच्या काळात शहरातील सर्व कचऱ्यावर प्रक्रिया सुलभ होणार असून नागपूर शहर हे घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरामुक्त शहर म्हणून संपूर्ण भारतात ओळखले जाईल. या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. या प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या बायोगॅसवर शहरातील १९८ बसेससाठी सीएनजी ही ग्रीन एनर्जी उपलब्ध होणार आहे. खासगी भागीदारी तत्त्वावर सुरू होणाऱ्या या प्रकल्पासाठी महानगरपालिकेला कुठलाही खर्च येणार नसून शहरात निर्माण होणाऱ्या १ हजार ३०० मेट्रिक टन कचरा व्यवस्थापनावर होणारा दैनंदिन खर्च आता वाचणार आहे.

## ऑनलाइन सट्टेबाजी रॅकेटवर पनवेल पोलिसांची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांनी ऑनलाइन सट्टेबाजी व जुगार रॅकेटवर मोठी कारवाई करत १३ आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे दोन लाख ७१ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई वाकडी येथील परिसरात करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपींनी संगनमत करून भारतात प्रतिबंधित असलेल्या ऑनलाइन गेमिंग अॅप व वेबसाइटच्या माध्यमातून लोकांना सट्टेबाजीस प्रवृत्त केले.

यासाठी विविध व्यक्तींच्या बँक खात्यांची माहिती, पासबुक, एटीएम कार्ड, मोबाइल क्रमांक तसेच इतर कागदपत्रांचा वापर करण्यात येत होता. आरोपी "लोटस ३६५" नावाच्या अॅप/लिंकच्या माध्यमातून क्रिकेटसह विविध खेळांवर ऑनलाइन सट्टा खेळण्याची सुविधा पुरवत असल्याचा आरोप आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून १७ मोबाइल फोन, सहा लॅपटॉप, चार लॅपटॉप चार्जर, चार एक्स्टेन्शन बोर्ड, १० मोबाइल चार्जर, एक वायफाय राऊटर, पासबुक, चेकबुक, क्रेडिट व डेबिट कार्ड, सिमकार्ड, पासपोर्ट तसेच लेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या डायऱ्या जप्त केल्या.

जप्त मुद्देमालाची किंमत २,७१,६३० रुपये आहे. याप्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१८(४), ३(५), महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा १८८७ चे कलम ४ व ५ तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ४३, ६६ आणि ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिपाली पाटील (सायबर सेल), सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुरुद्ध गिजे तसेच पनवेल शहर व पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने केली.



## नोकरीच्या नावाने नऊ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील एका नामांकित शाळेत सरकारी क्लार्क पदावर नोकरी लावून देण्याचे खोटे आमिष दाखवून एका महिलेसह दोघांनी एका सुशिक्षित तरुणाची तब्बल नऊ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

अरुणा जाधव व अमोल राऊत अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. या दोघांची २०२३ मध्ये नेरूळ येथे मयुर मानकर (३०) या सुशिक्षित तरुणासोबत ओळख झाली होती. त्यावेळी अरुणा व अमोल यांनी त्याची कोपरखैरणे सेक्टर ८ मध्ये भेट घेऊन त्याला कामोठे येथील नामांकित विद्यालय व ज्युनियर कॉलेजमध्ये सरकारी कोट्यातून कायमस्वरूपी नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत त्याच्याकडून गेल्या तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने लाखो रुपये उकळले. यात त्यांनी मयुरकडून सहा लाख रुपये ऑनलाइन स्वरूपात आणि तीन लाख रुपये रोख असे एकूण नऊ लाख रुपये उकळले.

यानंतर खोटे नियुक्ती पत्र दिले. हे पत्र घेऊन मयुर संबंधित ज्युनियर कॉलेजमध्ये गेला असता ते बनावट असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर मयुरने या दोघांकडे पैसे परत मागितले असता त्यांनी पैसे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मयुरने कोपरखैरणे पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली.

## आचारसंहितेचा भंग करीत बीडीओंची कार्यालयात वडे-मटण पार्टी; व्हिडीओ व्हायरल

**म्हसळा : प्रतिनिधी**

एकीकडे म्हसळा तालुका सध्या भीषण पाणीटंचाईने होरपळत असून नागरिक पाण्यासाठी वणवण फिरत आहेत, तर दुसरीकडे महाराष्ट्र विधान परिषद रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम १८ मेपासून घोषित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच १८ मेपासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजेच २५ जूनपर्यंत राज्यात आचारसंहिता सुरू आहे. शासकीय कार्यालयात व कार्यालयीन वेळेत वैयक्तिक कार्यक्रम (उदा. निरोप समारंभ, वाढदिवस) साजरे करू नयेत असे आदेश असूनही म्हसळा गटविकास अधिकारी माधव



जाधव यांनी आपला सेवापूर्ती गौरव कार्यक्रम सेवापूर्तीआधीच शुक्रवारी (दि. २९) साजरा केला.

एकाचवेळी आचारसंहिता भंग, शासकीय आदेशाची पायमल्ली, पाणीटंचाईकडे दुर्लक्ष केल्याने त्यांचे तत्काळ निलंबन आणि चौकशी व्हावी अशी मागणी पुढे येत आहे. गटविकास अधिकारी (बीडीओ) माधव जाधव यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने शासकीय वेळेतच तब्बल चार ते पाच तास ही जंगी पार्टी सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने तालुक्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्टीचे व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत.

गटविकास अधिकारी माधव जाधव ३० किंवा ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत, मात्र शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांमुळे पार्टीचा बेत हुकू नये म्हणून या अधिकाऱ्यांनी चक्क शुक्रवारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतच शासकीय इमारतीत मटण-वड्यांचा जंगी बेत आखला. शासकीय वेळेचा व कार्यालयाच्या पवित्र्याचा विचार न करता पंचायत समितीचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि तालुक्यातील सर्व ग्रामसेवक या पार्टीत गुंग झाले होते. कर्तव्यपूर्तीचा पुरता विसर पडलेले हे अधिकारी तब्बल चार ते पाच तास जेवणावर ताव मारत होते, असे व्हायरल व्हिडीओवरून स्पष्ट होत आहे.

## पोलादपूर येथे ट्रकला कारची धडक; मायलेकी ठार; पितापुत्र जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील लोहारे हद्दीत रस्त्याबाहेर उभ्या आयशर ट्रकला भरधाव कारने मागील बाजूने धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील मायलेकी जागीच ठार झाल्या, तर बापलेक गंभीररित्या जखमी झाले. हे कुटुंब अहिल्यानगर येथून दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठामध्ये निघाले होते.

पोलादपूर तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याबाहेर आयशर ट्रक (क्र. एमएच ०४-१६३८) उभा करून चालक नदीकिनारी शौचास गेला असता उभ्या असलेल्या आयशर ट्रकला मागून येणाऱ्या कारने (एमएच ०८-२४३९) महामार्ग सोडून जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये कारचालक दापोलीतील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कर्मचारी अनिल रावसाहेब मरकड (४४) आणि मुलगा चिन्मय मरकड (५) हे गंभीररित्या जखमी झाले. अनिल मरकड यांना अधिक उपचारासाठी मुंबईकडे पाठविण्यात आले, तर मुलगा चिन्मय याला महाड येथे पाठविण्यात आले आहे. या अपघातामध्ये अनिल मरकड यांच्या पत्नी सुवर्णा मरकड (४५) व मुलगी अनुश्री (१६) यांचा अपघातस्थळी जागीच मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, उपनिरीक्षक सतीश पवार व पोलीस कर्मचारी, नरवीर व काळभैरवनाथ रेस्क्यू टीम घटनास्थळी पोहोचले. अनिल मरकड हे अहिल्यानगरचे रहिवासी असून पत्नी सुवर्णा दापोलीतील भारतीय स्टेट बँकेच्या कर्मचारी आहेत.

## लक्ष्मणस्वामी जंगम यांची सेवानिवृत्ती

**धाटाव : प्रतिनिधी**

ज्ञानभास्कर गुरू महादेव शिवाचार्य वाईकर महाराज (मठसंस्थान वाई) यांच्या आशीर्वादाने प्रेरित, लांढर गावचे सुपुत्र तथा जंगम समाजाचे आधारस्तंभ लक्ष्मणस्वामी नारायण जंगम यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कामगार, सामाजिक, धार्मिक आणि शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या लक्ष्मणस्वामी जंगम यांच्या कार्याचा यावेळी मान्यवरांनी गौरव केला.



२०००मध्ये एफडीसी कंपनीमध्ये कार्यरत झालेल्या लक्ष्मणस्वामी जंगम यांनी तब्बल २५ वर्षे प्रामाणिकपणे आपली सेवा बजावली. कामगार क्षेत्रातील विविध प्रश्नांमध्ये त्यांनी नेहमी सकारात्मक भूमिका घेत कंपनी आणि कामगार यांच्यात समन्वय साधण्याचे काम केले. अनेक महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांनी सहभाग घेतला असून शांत, संयमी आणि मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी सहकाऱ्यांच्या मनात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे.

## नवी मुंबईत क्रॉस डिसेबिलिटी अर्ली इंटरव्हेन्शन सेंटरचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई येथे ० ते ६ वर्षे वयोगटातील बौद्धिक व विकासात्मक दिव्यांगत्व असलेल्या बालकांसाठी सर्वसमावेशक प्रारंभिक हस्तक्षेप सेवा उपलब्ध करून देण्यासाठी 'क्रॉस डिसेबिलिटी अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर'चे उद्घाटन खारघर येथे करण्यात आले. नवीन स्थापन करण्यात आलेल्या या केंद्राचा उद्देश विविध विकासात्मक गरजा असलेल्या बालकांसाठी लवकर ओळख, मूल्यमापन, उपचारात्मक हस्तक्षेप व पुनर्वसन सेवा उपलब्ध करून देणे हा आहे.



या उपक्रमामुळे समावेशक शिक्षणाला चालना मिळून बालकांच्या सर्वांगीण विकासास महत्त्वपूर्ण मदत होणार आहे.या केंद्रामध्ये आधुनिक उपचार व पुनर्वसन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्यामध्ये ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, फिजिओथेरपी, मानसशास्त्र, ऑडिओलॉजी तसेच व्हर्च्युअल रियालिटी आधारित हस्तक्षेप सेवा समाविष्ट आहेत. लहान बालकांसाठी संवेदनशील व समावेशक वातावरण निर्माण करण्यासाठी सेन्सरी-फ्रेंडली अंतर्गत रचना, परस्परसंवादी शैक्षणिक साहित्य आणि बालक-केंद्रित उपचार कक्ष विकसित करण्यात आले आहेत.

डॉ. रवी प्रकाश सिंह, प्रभारी अधिकारी, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेमार्फत "दिव्यांग बालकांच्या समावेशक शिक्षणासाठी क्रॉस डिसेबिलिटी अर्ली इंटरव्हेन्शन" या विषयावर 'प्रथम' संस्थेच्या सहकार्याने २८ मे ते ३० मे या कालावधीत तीन दिवसीय सी.आर.ई. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, या कार्यक्रमामध्ये एकूण ४९ पुनर्वसन व्यावसायिकांनी सहभाग नोंदविला. खेळावर आधारित मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान विकास या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

पान १ वरुन

## पनवेल जॉब ड्राईव्हला उत्स्फूर्त प्रतिसाद




या उपक्रमामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी शोधण्यासाठी मोठ्या शहरांमध्ये धावपळ करण्याची गरज भासली नाही. एकाच छताखाली विविध क्षेत्रांतील कंपन्यांशी संपर्क साधण्याची संधी उपलब्ध झाल्याने सहभागी युवक-युवतींनी समाधान व्यक्त केले. रोजगाराभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून युवकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आयोजकांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी कंपन्या, एकलव्य फाउंडेशनचे पदाधिकारी, स्वयंसेवक, कार्यकर्ते आणि सर्व सहकाऱ्यांनी मेहनत घेतली. त्यांच्या योगदानाबद्दल आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## खारघरच्या इस्कॉन मंदिरात कर्करुग्णांसाठी उपक्रम

होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट अंतर्गत आधुनिक वैद्यकीय उपचारांसोबत योग, ध्यान, संगीत उपचार, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि सकारात्मक जीवनशैली यांचा समन्वय साधून रुग्णांना सर्वांगीण आधार देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे, तर कृष्णा संजीवनी द डिव्हाईन म्युझिक उपक्रमाद्वारे भक्तिमय संगीताच्या माध्यमातून मानसिक स्वास्थ्य आणि अंतर्मनातील शांतता वृद्धिंगत करण्यावर भर दिला जाणार आहे.

या कार्याला बळ मिळावे आणि अधिकाधिक रुग्णांपर्यंत या सेवेचा लाभ पोहचावा यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली. त्यांच्या या योगदानाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात केवळ वैद्यकीय उपचारच नव्हे, तर मानसिक आणि आध्यात्मिक बळही तितकेच महत्त्वाचे असल्याचा संदेश देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत राज्यपालांनी व्यक्त केले.

## एसआयआर मॅपिंग मोहिमेला सानपाडावासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

१५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या एसआयआर मॅपिंग मोहिमेंतर्गत सानपाडा विभागातील बेलापूर विधानसभा क्षेत्रातील यादी भाग क्र. १०७ ते १३६ मधील मतदारांकरिता येथे दोन दिवसीय विशेष कॅम्पचे आयोजन ३० आणि ३१ मे रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ दरम्यान साधू वासवानी हायस्कूल, सेक्टर १५, सानपाडा येथे करण्यात आले आहे.

उपमहापौर दशरथ भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या पुढाकारातून या दोन दिवसीय शिबिराचे आयोजन १५१ बेलापूर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने करण्यात आले आहे. नागरिकांची धावपळ टळावी यासाठी सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या मदतीने अगदी सुटसुटीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने ही प्रक्रिया पार पाडली जात आहे.

कॅम्पच्या पहिल्याच दिवशी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदविला. रविवारी या मोहिमेचा शेवटचा दिवस आहे, तरी अद्याप मॅपिंग न केलेल्या नागरिकांनी घरातील एका सदस्याला पाठवून ही प्रक्रिया नक्की पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन या एसआयआर विशेष शिबिराचे आयोजक उपमहापौर दशरथ भगत, नगरसेवक निशांत भगत व नगरसेविका प्रिती संदीप भगत यांनी प्रभाग क्र. १८ मधील मतदार नागरिकांना केले आहे.

# कळंबोलीतील अनधिकृत झोपड्यांवर पनवेल महानगरपालिकेचा हातोडा



**पनवेल, कळंबोली : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरोधात प्रशासनाने पुन्हा एकदा कडक पाऊल उचलले आहे. कळंबोली येथील महापालिकेच्या धारण तलावाजवळ, सिंह हॉस्पिटलसमोर असलेल्या तब्बल ३३ अनधिकृत झोपड्यांवर नुकतीच महापालिकेने धडक तोडक कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरात अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या थेट आदेशानुसार ही मोहीम राबवण्यात आली. महापालिकेच्या जागेवर अनधिकृतपणे ताबा मिळवून या झोपड्या उभारण्यात आल्या होत्या. तलावाच्या सुशोभीकरणाला आणि परिसरातील सुरक्षिततेला यामुळे बाधा निर्माण होत असल्याची तक्रार होती. संपूर्ण कारवाई प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर आणि प्रभाग निरीक्षक अरविंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने फौजफाट्यासह घटनास्थळी धडक दिली. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पथकाने आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून काही तासांतच सर्व ३३ अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त करून महापालिकेची जागा रिकामी केली. पालिका क्षेत्रात यापुढेही अनधिकृत बांधकामे खपवून घेतली जाणार नाहीत, असा इशारा या कारवाईतून प्रशासनाने दिला आहे.

## रिक्षाचालकाने बसचालकाच्या डोक्यात मारला हातोडा

**पनवेल : वार्ताहर**

एसटी बस किंचित घासल्याच्या किरकोळ कारणावरून एका माथेफिरू रिक्षाचालकाने थेट एसटी बसचालकाच्या डोक्यात हातोडीने घाव घालत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना पनवेलमधील तक्का सिग्नल परिसरात घडली. या हल्ल्यात एसटी चालक गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर संतप्त प्रवाशांनी आरोपी रिक्षाचालकाला पकडून चांगलाच चोप दिला. त्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

विटा-मुंबई मार्गावरील एसटी बस पनवेलमधील शिवशंभो नाका येथील चौकात आली. तेव्हा एसटी बस रिक्षाला किंचित घासली गेली. या घटनेनंतर बसचालक आणि रिक्षाचालक यांच्यात जोरदार शाब्दिक वाद सुरू झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर रिक्षाचालक विलास म्हात्रे याने संतापाच्या भरात हातोडी काढून थेट बसचालकाच्या डोक्यावर हल्ला केला. हातोडीचा जोरदार फटका बसल्याने चालक गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. या घटनेनंतर जखमी चालकाला तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, एसटी बसच्या चालकावर झालेला जीवघेणा हल्ला पाहून बसमधील प्रवासी आणि परिसरातील नागरिकांनी आरोपी रिक्षाचालक विलासला पकडून चांगलाच चोप दिला. या प्रकारामुळे तक्का सिग्नल परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पनवेल शहर पोलिसांनी आरोपी रिक्षाचालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# शगुन चौक आता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक!

**उरण : बातमीदार**

उलवे सेक्टर १९ येथील शगुन चौक बसस्थानकाचे नाव अधिकृतपणे बदलण्यात आले असून आता ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक म्हणून ओळखले जाणार आहे. नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमातर्फे बस स्थानकाच्या नावामध्ये हा महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. उलवे नियोजन समिती व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्या वतीने काही महिन्यांपूर्वी यासाठी आंदोलन करण्यात आले होते.




सेक्टर १९ येथील चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारावा तसेच बस तिकीटांवर व दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे शगुन चौक हे नाव बदलून छत्रपती शिवाजी महाराज चौक करावे, अशी मागणी करण्यात आली होती. सातत्याने केलेल्या पत्रव्यवहाराला आणि पाठपुराव्याला आता यश आले आहे. प्रणालीमध्ये आणि बस तिकिटांवर आता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नवीन नाव छापून येण्यास सुरुवात झाली आहे. उलवे शहरातील नागरिक आणि शिवप्रेमी गेल्या अनेक वर्षांपासून या नावबदलासाठी सिडको प्रशासन व परिवहन विभागाकडे पाठपुरावा करीत होते, मात्र या मागण्यांकडे अनेकदा दुर्लक्ष करण्यात आले होते. मागणी पूर्ण झाल्याने सर्वच शिवप्रेमी, उलवे नियोजन समिती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद साजरा केला.

या वेळी बोलताना उलवे नियोजन समितीचे अध्यक्ष संतोष काटे म्हणाले, हा सर्वांचा विजय आहे. सर्वांनी यासाठी पाठपुरावा केला होता. आता जनतेची व शिवप्रेमींची मागणी पूर्ण झाली आहे. त्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे व परिवहन विभागाचे आभार मानले आहेत.




**उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त एम.जी. ग्रुपतर्फे शेलघर येथे शुक्रवारी कृतज्ञता सोहळा उत्साहात झाला. यावेळी कामगार नेते महेंद्र घरत, बांधकाम व्यवसायातील डेल्टा ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीन गाजीपारा, टुडे ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर ब्रदेश शहा, सोनाली रिएलिटीचे मॅनेजिंग डायरेक्टर मयुरेश चौधरी आदी उपस्थित होते.**

## उरणमधील शेतकरी 'फार्मर कप'साठी सज्ज; प्रशिक्षण कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद



**उरण : प्रतिनिधी**

जीवन केणी उरण तालुक्यातील चिरनेर येथे कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.३०) 'सत्यमेव जयते फार्मर कप' स्पर्धेच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रगतशील शेतकरी बळीराम म्हात्रे यांच्या शेतात झालेल्या या कार्यशाळेला चिरनेर येथील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सुजलाम शेतकरी गट व श्री महागणपती शेतकरी गटाच्या शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून शेतीविषयक महत्त्वाची माहिती जाणून घेतली. शेतकऱ्यांना गट शेतीचे महत्त्व आणि शेतीतील नवीन व्यवस्थापन पद्धती शिकवून व्यवसायाभिमुख दृष्टिकोन विकसित करणे, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. एकत्रित गट शेतीमुळे संसाधनांचा प्रभावी वापर, मोठी बाजारपेठ मिळवणे आणि उत्पादन खर्च कमी करणे यांसारखे फायदे होतात, याबाबत प्रशिक्षणात सविस्तर माहिती देण्यात आली. शेतीत तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उत्पादन आणि उत्पन्न वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना सज्ज करणे, हा यामागील हेतू आहे.

पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक आशिष लाड यांनी 'फार्मर कप' स्पर्धेचे नियम, विविध टप्पे आणि शेती व्यवस्थापनातील नव्या पद्धती, जसे की निवासी प्रशिक्षण व शेतीचे व्यावसायिक पैलू, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षकांनी स्पर्धेची गरज, अंमलबजावणीचे टप्पे आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी शेतकऱ्यांच्या भूमिकेबाबत चर्चा केली. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना कृषी सहाय्यक अधिकारी आदीका पानसरे यांनी 'फार्मर कप' स्पर्धेचे महत्त्व आणि शेतीच्या व्यवस्थापन प्रणालीतील नवीन बदलांविषयी माहिती दिली. २०२६च्या खरीप हंगामापासून सुरू होणाऱ्या 'सत्यमेव जयते फार्मर कप' स्पर्धेत शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

## सर्पमित्राकडून अजगराला जीवदान

**उरण : वार्ताहर**

चिरनेर मुळपाडा येथील अरुण काशिनाथ मुंबईकर यांच्या घराजवळ ठेवण्यात आलेल्या पत्र्याच्या अडगळीत भर दुपारच्या वेळेत गारव्याच्या शोधात आलेला साधारणतः नऊ ते १० फूट लांबीचा भलामोठा अजगर नुकताच आढळून आला. अरुण मुंबईकर यांच्या पत्नी कमल मुंबईकर या एकट्याच घरात असल्यामुळे घाबरून गेल्या, मात्र प्रसंगावधान राखत त्यांनी मुलगा प्रतीक मुंबईकरला मोबाइलद्वारे अजगराचा वावर असल्याची माहिती दिली.



प्रतीक मुंबईकर यांनी स्थानिक सर्पमित्र जयवंत ठाकूर यांच्याशी संपर्क साधून घराजवळ अजगर असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी घटनास्थळ गाठले आणि गारव्याच्या शोधात आलेल्या अजगराला मोठ्या शिताफीने पकडून जीवदान दिले. मानवी वस्तीत उकाड्यामुळे वन्यजीव शिरकाव करू लागले आहेत. त्यामुळे साधारणतः नऊ ते १० फूट लांबीचा हा अजगर दुपारच्या भर उन्हाच्या वेळी गारव्याच्या शोधात आला असावा, मात्र कोणाला इजा होण्याआधीच सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या अजगराला काळजीपूर्वक पकडून जीवदान दिले. त्यानंतर त्याला उरण तालुका वनविभागाच्या निर्देशानुसार सुरक्षित वनक्षेत्रात सोडण्यात आले.

## संभाव्य अपघात टाळण्यासाठी उपाययोजनेची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानकात प्लॅटफॉर्मच्या सुरुवातीलाच असलेल्या खराब व धोकादायक भागामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

गर्दीच्या वेळी हजारो प्रवासी गाडी पकडण्यासाठी धावपळ करतात. अशा वेळी एखाद्याचा पाय अडकून दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानक परिसरातील तुटलेले भाग, उघडी जागा व असमतोल रस्त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना त्रास सहन करावा लागतो. संभाव्य अपघात टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.





# मुझे कुछ कहना है @ २५ वर्षे

## कपूर आणि कपूर पुन्हा कपूर आणि कपूर

झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

अधूनमधून स्टारपुत्राचे चित्रपट पडद्यावर येण्याचे दिवस असतात. लाट असते म्हणा ना? ऐंशीच्या दशकाच्या पूर्वार्धात राजेंद्रकुमारचा मुलगा कुमार गौरव (लव्ह स्टोरी), सुनील दत्तचा पुत्र संजय दत्त (रॉकी), धर्मेंद्रचा मुलगा सनी देओल (बेताब), नूतनचा मुलगा मोहनीश बहेल (तेरी बाहो मे), देव आनंदचा मुलगा सुनील आनंद (आनंद और आनंद), राज कपूरचा मुलगा राजीव कपूर (एक जान है हम), मनोजकुमारचा मुलगा कुणाल (क्रांती) वगैरे वगैरे. त्यांची पुढची वाटचाल कशी झाली, चढ उतार कसे, त्यांचे प्रगती पुस्तक कसे आहे हे प्रत्येक चित्रपटासह स्पष्ट होत होत गेले... साप सिडीचा खेळ असतो हा.


नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीलाही अशीच स्टार पुत्र लाट आली. तनुजाची मुलगी काजोल, रणधीर कपूर आणि बबिता यांची मुलगी करिश्मा, धर्मेंद्रचा मुलगा बॉबी देओल, राजेश खन्ना आणि डिंपल यांची मुलगी ट्विंकल, शर्मिला टागोरचा मुलगा सैफ अली खान, विनोद खन्नाचा पुत्र अक्षय खन्ना आणि राहुल खन्ना, राजकुमारचा मुलगा पुरू राजकुमार, माला सिन्हाची मुलगी प्रतिभा असे अनेक स्टार पुत्र आले. एक प्रकारे हे वारसदार असतात, पण स्पर्धेत टिकून राहण्यासाठी गुणवत्ता, योग्य संधी, मेहनत आणि चित्रपट सुपर डुपर हिटचे सातत्य हवे. एकेक चित्रपट करत करत नवीन गोष्टी शिकण्याची गरज असते. जो शिकतो तो तरतो.

धर्मेंद्र निर्मित आणि शेखर कपूर दिग्दर्शित 'बरसात' चा जंगी मुहूर्त बॉबी देओल आणि करिश्मा कपूरवर झाला, पण काही कारणाने चित्रीकरण सुरू होईना तोपर्यंत शेखर कपूरने चित्रपट सोडला, याच गडबडीत बबिताने आपल्या कन्येला करिश्माला अर्थात 'लोलो'ला या चित्रपटातून काढून हरिशसोबतचा 'प्रेम कैदी' दिला, तर 'बरसात' चे दिग्दर्शन राजकुमार संतोषीकडे येताना बॉबी देओलची नायिका म्हणून ट्विंकल खन्ना आली.

नवीन दशकाच्या सुरुवातीला आणखी एकदा स्टारपुत्र लाट आली. एव्हाना हिंदी चित्रपट बराच पुढे गेला होता. अधिक चकाचक झाला होता. चित्रपटाची पूर्वप्रसिद्धी अधिक महत्त्वाची नि खर्चिक गोष्ट होत चालली होती. राकेश रोशनचा पुत्र ऋतिक रोशन, अमिताभ बच्चनचा पुत्र अभिषेक बच्चन, रणधीर कपूर आणि बबिता यांची कन्या करिना कपूर, जितेंद्रचा पुत्र तुषार कपूर, शत्रुघ्न सिन्हाची मुलगी सोनाक्षी सिन्हा, ऋषि कपूर आणि नीतू सिंग यांचा पुत्र रणबीर कपूर, अनिल कपूरची मुलगी सोनम कपूर वगैरे वगैरे अनेक. काहीसे हायफाय. जास्त इंग्रजी बोलणारे.


स्टारपुत्रांना लहानपणापासूनच आपल्या पालकांचे पडद्यावरचे रूपडे, चित्रपटसृष्टीतील स्टारडम, खरे खोटे नातेसंबंध, घरातील वावर, यशापयशातील मानसिक भावनिक चढउतार माहीत असतात. चित्रपट कलाकाराचे आयुष्य वरकरणी सुखासीन, ग्लॅमरस असते. ते टिकवण्यासाठी, वाढवण्यासाठी सतत प्रयत्न करावा लागतो. अशा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनेक गोष्टी असतात.

आणि अशाच पार्श्वभूमीवर तुषार कपूर



आणि करिना कपूर या कपूर आणि कपूर जोडीचा वासू भगनानी निर्मित आणि सतिश कौशिक दिग्दर्शित 'मुझे कुछ कहना है' पडद्यावर आला. मुंबईत हा चित्रपट २४ मे २००१ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या प्रदर्शनास पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. कधी सरकला हा काळ? काही समजलं?

करिना कपूरने, खरं तर तिची आई बबिताने. तिच तेव्हा आपल्या दोन्ही मुलींच्या कारकिर्दीची आखणी करत असे. याबाबत ती 'कपूर मदर', बबिताच्या चाणाक्ष डावपेचाच करिनाला राकेश रोशन दिग्दर्शित 'कहो ना प्यार है '(२०००) मध्ये ऋतिक रोशनची नायिका म्हणून रूपेरी पदार्पणाची संधी मिळाली. महालक्ष्मी येथील फेमस स्टुडिओत चित्रीकरणाचे पहिलं सत्रही पार पडले. तशी 'अच्छी खबर' सगळीकडे प्रसिद्ध होत असतानाच 'कहानी मे टर्न आणि ट्विस्ट' आला. बबिताने आपल्या कन्येला अधिक पॉवरफुल अशी रूपेरी पदार्पणाची संधी मिळावी म्हणून राकेश रोशनला सांगून करिनाला 'कहो ना प्यार है' सोडायला भाग पाडले आणि जे. पी. दत्ता दिग्दर्शित 'रिफ्यूजी' (२०००)मध्ये अभिषेक बच्चनची नायिका केले. मोठ्या सेलिब्रिटीजचा मुलगाही मोठाच असतो हे समीकरण आहे हो. 'कहो ना प्यार है'मध्ये अमिषा पटेल आली आणि ही प्रेमकथा सुपर डुपर हिटही ठरली. बबिता एवढ्यावरच थांबली असती तर




ती महत्वाकांक्षी नाही असा उगाच गैरसमज झाला असता, आपल्या बेबोला अर्थातच करिना कपूरला आणखी चित्रपटात फिट्ट केले आणि त्यातच एक चित्रपट, मुझे कुछ कहना है.

बबिताने आपला एकेकाळचा जम्पिग जॅक हिरो जितेंद्र याचा पुत्र तुषार कपूर यांच्यासोबत बेबोला नायिका म्हणून उभं करणं हा तिच्या एकूणच डावपेचांचा एक भागच. चित्रपट अभ्यासात हेदेखील यायला हवे का? पडद्यामागे अनेक गोष्टी घडत बिघडत असतात.

मला आठवतंय, मुझे कुछ कहना है पूर्णतेच्या आणि आपला पुत्र तुषार याच्या रूपेरी पडद्यावरील पदार्पणाच्या निमित्ताने मुंबईतील आम्हा काही निवडक सिनेपत्रकारांना आपल्या जुहू येथील गुलमोहर सोसायटीतील कृष्णा बंगल्यावर एक अतिशय जोरदार शोरदार ओली पार्टी दिली. कॉकटेल फंडा. जितेंद्र हा मुळचा आमच्या गिरगावातील रामचंद्र बिल्डिंगचा (नंतरचे नाव सेवा सदन) रहिवाशी. तेथे राहत असतानाच तो चित्रपटसृष्टीत आला. मिळालेल्या लहान मोठ्या संधीचा सदुपयोग करत करत स्टार झाला. नावारूपास आल्यावर तो वांद्रे येथील पाली हिलवरील निभाना या तेव्हा नवीन असलेल्या भव्य इमारतीत राह्यला गेला. (याच इमारतीत प्रेम चोप्रा, रणजीत, तसेच विनोद मेहरा आणि असरानी राहत होते. रणजीत काही वर्षांनी जुहूला बंगल्यात राहायला गेला). जितेंद्रने टॉपवर असताना निभाना इमारतीतून जुहूला येताना हा बंगला बांधला. काही वर्षांनी याच परिसरात आणखी एक बंगला उभारला. आणि या पार्टीला आम्हा प्रत्येक सिनेपत्रकाराचे जितेंद्रने अगत्याने




स्वागत केले. माझं तर मराठीत केले. आपण सेलिब्रेटीज आहोत तेव्हा आपण आपला स्टारडम जपला पाहिजे असे न वागता आपण यजमान असून पाहुण्यांचे यथोचित स्वागत करायला हवे याचे भान त्याने ठेवले, हेच तर जितेंद्र गिरगावात लहानाचा मोठा झाला तरी आपल्यावरचे संस्कार विसरला नाही हेच जणू दाखवून देत होता. चित्रपटसृष्टीतील माझ्या भटकंतीत असे लाईव्ह अनुभव विलक्षण सुख देणारे.

... या बंगल्याच्या तिसऱ्या मजल्यावरील प्रशस्त हॉलमध्ये 'मुझे कुछ कहना है'ची गाणी दाखवायची हालचाल सुरू असतानाच बबिता आणि बेबोने अतिशय दिलखुलास एन्ट्री घेतली. या कपूरना देखणं दिसण्यासाठी वेगळे करावे लागत नाहीत, हे त्यांना प्रत्यक्षात पाहताच क्षणी लक्षात येते (मिडियात असल्यानेच असे अनेक सुखद योग मला अनेक वर्षे येत आहेत.) याक्षणी जितेंद्र आणि बबिता जोडीचे एकेक चित्रपट डोळ्यासमोर यायला लागले. एक जणू फ्लॅशबॅक. रविकांत नगाईच दिग्दर्शित फर्ज (१९६७) सुपर डुपर हिट होताच ही जोडी जमली. हिट पिक्चरचीच जोडीला करारबद्ध करण्यात निर्मिता, दिग्दर्शक आणि वितरक यांना विशेष रस असल्याचे ते दिवस. त्यानंतरचा कुंदनकुमार दिग्दर्शित 'औलाद' (१९६८) ही सुपर डुपर हिट. असं यश या जोडीच्या एस.डी. नारंग दिग्दर्शित अनमोल मोती (१९६९), तपी चाणक्य दिग्दर्शित 'बिखरे मोती' (१९७१), विजय भट्ट दिग्दर्शित 'बनफूल' (१९७१), एस. एम. अब्बास दिग्दर्शित 'एक हसिना दो दीवाने' (१९७२) या चित्रपटांना मिळाले नाही. दरम्यानच्या काळात बबिता कपूर खानदानाची सून बनली आणि तिने चित्रपटात भूमिका साकारणे थांबवले तरी ती चित्रपटसृष्टीत वावरत होती. (फर्ज आणि बनफूल मी गल्ली चित्रपटात गोणपाटावर बसून एन्जॉय केले हे यावेळी डोळ्यासमोर आले. तेव्हा, त्या वयात चुकूनही कधी मनात आले नाही की एके दिवशी मी जितेंद्रच्या बंगल्यावर अशा पद्धतीने पार्टीला जाईन. ही माझ्या अतिशय आठवणीत राहील अशी फिल्मी पार्टी.)

मुझे कुछ कहना है एक प्रेमपट हे नावावरून दिसतेय. राज कपूरच्या 'बॉबी' या सर्वकालीन सुपरहिट युथफुल चित्रपटातील गाण्याचा मुखडा. त्यावरून रुमी जाफरीने पटकथा लिहिली. करण शर्मा (तुषार कपूर) आणि पूजा सक्सेना (करिना कपूर) यांच्यातील ही दिलखुलास मनमोकळ्या वातावरणातील गीत संगीताने नटलेली प्रेमकथा. जोडीला अमरीश पुरी, रिंकी खन्ना (ही राजेश खन्ना आणि डिंपलची मुलगी) तसेच दलिप ताहिल, हिमानी शिवपुरी, ब्रिजेश हिरजे, दिनेश हिंगू, वगैरे वगैरे. अन्नू मलिकच्या संगीतातील रब्बा मेरे रब्बा, मैने कोई जादू, दुपट्टा अशी उडती गाणी त्या काळात लोकप्रिय झाली. नंतर कधीतरी आठवत. या चित्रपटाच्या प्रदर्शनास पंचवीस वर्षे झाली, पण ती इतकी आणि अशी भरभर गेली की हा (आणि त्या काळातील अनेक चित्रपट) हे इतके जुने झाले आहेत असे वाटत नाही. याचा अर्थ ते आजही तरुण आहेत असेही नाही. जुने चित्रपट म्हटल्यावर साधारण सत्तरच्या दशकापर्यंतचे चित्रपट गणावेसे वाटतात... मुझे यह कहना है.

---

# जनगणना म्हणजे नव्या युगाची सुरुवात

भारताची जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून देशाच्या लोकसंख्यात्मक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे व्यापक चित्र सादर करणारी प्रक्रिया आहे. देशातील सर्वात मोठा प्रशासकीय उपक्रम म्हणून ओळख असलेल्या जनगणना गाव आणि शहर पातळीवरील सर्वात विश्वासार्ह माहितीचा स्रोत मानली जाते. पुराव्यावर आधारित शासनव्यवस्था, विकास नियोजन, कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी, शैक्षणिक संशोधन, व्यावसायिक धोरणे, तसेच मतदारसंघ पुनर्रचना आणि लोकप्रतिनिधित्व यांसारख्या लोकशाही प्रक्रियांसाठी ही माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते. जनगणनेद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीमुळे शासन आणि विविध संस्था लोकसंख्येतील बदल समजून घेऊन नागरिकांच्या गरजांनुसार धोरणे आखू शकतात.

भारताने १८७२पासून अखंड जनगणनेची परंपरा जपली आहे, त्यामुळे जगातील काही मोजक्या देशांमध्ये भारताला विशेष ऐतिहासिक स्थान प्राप्त झाले आहे. कोविड-१९ महामारीमुळे २०२१ची जनगणना पुढे ढकलण्यात आल्यानंतर आता जनगणना २०२७ ही देशाची एकूण सोळावी आणि स्वातंत्र्यानंतरची आठवी जनगणना ठरणार आहे. भारतात जनगणना "डी फॅक्टो कॅनव्हासर पद्धतीने" केली जाते. या पद्धतीत नियुक्त प्रगणक ठराविक कालावधीत प्रत्येक घराला भेट देऊन नागरिकांकडून थेट माहिती संकलित करतात.

काळानुसार भारतातील जनगणना प्रक्रियेची कार्यपद्धती देशाच्या विशाल लोकसंख्या, भौगोलिक विविधता आणि प्रशासकीय गरजांनुसार विकसित होत गेली आहे. पूर्वी १९३१पर्यंत एका रात्रीत एकाच वेळी जनगणना करण्याची पद्धत वापरली जात होती. मात्र, व्यावहारिक आणि व्यवस्थापकीय अडचणींमुळे ती बंद करण्यात आली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने घरगुती माहिती संकलनाची सध्याची पद्धत स्वीकारण्यात आली. दुर्गम, कठीण आणि हिमवृष्टीग्रस्त भागांमध्येही प्रत्येक व्यक्तीची नोंद व्हावी यासाठी विशेष व्यवस्था केली जाते, ज्यामुळे जनगणना प्रक्रिया सर्वसमावेशक, व्यापक आणि संपूर्ण देशाचे प्रतिनिधित्व करणारी ठरते.

**आधीच्या जनगणनांपेक्षा आताची जनगणना वेगळी का?**

भारत जनगणना २०२७द्वारे एक ऐतिहासिक टप्पा गाठणार आहे, कारण ही देशातील पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना असेल. पारंपरिक कागदी पद्धतीऐवजी पहिल्या टप्प्यातील घरयादी व घरगणा (HLO)साठी माहिती "Census २०२७-HLO" या विशेष मोबाईल ॲपद्वारे संकलित केली जाणार आहे.

हे मोबाईल ॲप सोपे, सोयीस्कर आणि वापरण्यास सुलभ अशा पद्धतीने डिझाइन करण्यात आले आहे, जेणेकरून सर्व प्रगणक आणि पर्यवेक्षक सहजपणे त्याचा वापर करू शकतील. या ॲपमुळे मोठमोठे कागदी फॉर्म बाळगण्याची गरज राहणार नाही, तसेच कार्यपत्रके, संक्षिप्त अहवाल आणि इतर पुनरावृत्ती होणारे कागदी काम कमी होऊन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत.

जनगणना २०२७मधील आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे "स्व-गणना" (Self-Enumeration) पद्धत. प्रथमच नागरिकांना अधिकृत वेब पोर्टल https://se.census.gov.in द्वारे स्वतःच्या घराची आणि कुटुंबाची माहिती सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्रासह देशभरातील दिवसभर कामानिमित्त घराबाहेर असणाऱ्या नागरिकांसाठी ही सुविधा विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. ठराविक कालावधीत एखाद्या कुटुंबाने स्व-गणना पूर्ण केली नाही तर प्रगणक प्रत्यक्ष भेट देऊन पुन्हा माहिती संकलित करतील.

सुरळीत अंमलबजावणी आणि रिअल-टाइम निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी, जनगणना २०२७चे जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS)द्वारे परीक्षण केले जाईल. या डिजिटल प्रणालीमुळे विविध स्तरांवरील जनगणना अधिकारी क्षेत्रीय कामकाजाची प्रगती, माहिती संकलनाची गुणवत्ता आणि व्याप्ती यावर रिअल-टाइम देखरेख ठेवू शकतील. मोबाईल ॲप, स्व-गणना पोर्टल आणि CMMS यांच्या माध्यमातून जनगणना २०२७ अधिक वेगवान, अचूक आणि कमी कष्टदायक होण्याची अपेक्षा आहे. यामुळे डिजिटल प्रशासनाच्या नव्या युगाची पायाभरणी होणार आहे.

**जनगणनेची कायदेशीर चौकट**

भारताची जनगणना ही जनगणना अधिनियम १९४८च्या तरतुदींनुसार आयोजित केली जाणारी जगातील सर्वात मोठी आणि सर्वात विश्वासार्ह प्रशासकीय प्रक्रिया म्हणून ओळखली जाते, हा कायदा देशभरातील गणनेसाठी वैधानिक आधार प्रदान करत आहे. भारताची जनगणना ही जगातील सर्वात मोठ्या आणि विश्वासार्ह प्रशासकीय उपक्रमांपैकी एक मानली जाते. ती "जनगणना अधिनियम १९४८" अंतर्गत राबवली जाते. या अधिनियमाच्या कलम ३ नुसार केंद्र सरकार अधिकृत राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून जनगणना घेण्याचा निर्णय जाहीर करू शकते. त्यानुसार भारत सरकारने १६ जून २०२५ रोजी जनगणना २०२७ची अधिसूचना प्रसिद्ध केली. ही प्रक्रिया सहकारी संघराज्यवादाच्या तत्त्वावर आधारित आहे.

**-राजू धोत्रे, विभागीय संवाद अधिकारी**

---

# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' ही उपाधी बहाल केली.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चोंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले




जात होते, परंतु अहिल्यादेवींनी आपली बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासन कौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.

१७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले. त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्याविषयी अपार आदर निर्माण झाला. 'राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे' हा त्यांचा मूलमंत्र होता.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरूंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा असा सर्वंकष विचार करून त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशा-प्रदेशात विभागणी होती त्या काळात 'बंधुता' पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यासारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता.

अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या.

भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते.

अहिल्यादेवींना 'पुण्यश्लोक' ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या राज्यकर्त्यालाच 'पुण्यश्लोक' म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात 'लोकमाता' म्हणून त्यांचे स्थान कायम आहे.

महाराष्ट्र शासनाने ही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण 'अहिल्यानगर' असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चोंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन व संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३००व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे.

आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

**-प्रवीण टाके,**
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

### महिलांना प्रोत्साहन देणारी स्टार्टअप योजना

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे. या योजनेंतर्गत महिलांनाः स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.
ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

# पाली बसस्थानकाला अखेर गती

## पुनर्बांधणी प्रकल्पाची परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून पाहणी

**पाली : प्रतिनिधी**

राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी (दि. ३०) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथील श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनाने आपल्या तीन दिवसीय कोकण दौऱ्याची सुरुवात केली. यावेळी त्यांनी बाप्पाच्या चरणी नतमस्तक होत कोकणातील रखडलेले विकासप्रश्न मार्गी लागावेत, अशी प्रार्थना केली. श्री बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टतर्फे त्यांचा सत्कारही करण्यात आला. दर्शनानंतर प्रताप सरनाईक यांनी पाली-सुधागड एसटी बसस्थानकाची प्रत्यक्ष पाहणी केली. बसस्थानकाच्या दुरवस्थेची गंभीर दखल घेत त्यांनी बसस्थानकाच्या पुनर्विकासासाठी तब्बल १४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली.



तसेच येत्या तीन महिन्यांत या प्रकल्पाचे भूमिपूजन होईल, अशी ग्वाही देत मंत्री प्रताप सरनाईक यांनी सुधागडसह रायगडवासीयांना मोठा दिलासा दिला. पाली बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी आणि अत्याधुनिक सुविधांनी सज्ज नव्या वास्तूच्या उभारणीसाठी शिवसेनेने तसेच विविध सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाल्याचे यावेळी दिसून आले. स्थानिक शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अनेक वर्षांपासून या प्रश्नासाठी आवाज उठवला होता. याबरोबरच ज्येष्ठ पत्रकार रवींद्रनाथ ओव्हाळ यांनीदेखील या प्रश्नावर वारंवार आंदोलन व उपोषण केले होते.पाली बसस्थानकासाठी सुमारे १५ हजार ७५७ चौरस मीटर जागा सन १९७१मध्ये संपादित करण्यात आली होती. त्यावर १९७८मध्ये उभारण्यात आलेली बसस्थानकाची इमारत कालबाह्य झाल्यानंतर २०२२मध्ये ती पाडण्यात आली.

त्यानंतर नव्या अत्याधुनिक बसस्थानकाची मागणी सातत्याने होत होती.नव्या बसस्थानकात ८ फलाटांचे सुसज्ज बसस्थानक, प्रशस्त प्रतीक्षालय, स्वतंत्र कॅन्टीन, विद्यार्थी व आरक्षणधारकांसाठी विशेष सुविधा, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, चालक-वाहकांसाठी विश्रामगृह, चौकशी केंद्र, प्रशासकीय कार्यालये, दुकाने, उपहारगृह तसेच विविध प्रवासी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. लवकरच निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष बांधकामाला गती दिली जाईल, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी पाहणी दौऱ्यादरम्यान दिली. शिवसेना सुधागड तालुका प्रमुख अनुपम कुलकर्णी यांनी सांगितले की, शिवसेनेच्या वतीने आमदार महेंद्र दळवी, पक्षाचे वरिष्ठ नेते तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने पाली परिसरातील चार महत्त्वाचे प्रश्न मंत्रालय स्तरावर संबंधित मंत्र्यांकडे सातत्याने मांडण्यात आले. यामध्ये पाली बसस्थानकाचे पुनर्विकास काम, ग्रामीण रुग्णालयाची उभारणी, पाली बायपास मार्ग तसेच शुद्ध पाणीपुरवठा योजना या प्रमुख मागण्यांचा समावेश होता.

या प्रश्नांसाठी शिवसेनेने सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे कामांना गती मिळत आहेत. पाली बसस्थानकासाठी १४ कोटींचा निधी मंजूर होणे हा त्याच प्रयत्नांचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी निगडित असलेले हे चारही प्रश्न शिवसेनेच्या माध्यमातून यशस्वीपणे सोडवले जात असल्याचे पाहून समाधान वाटत असल्याची भावना अनुपम कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

# खालापूर येथे आपत्तीपूर्व नियोजन बैठक

**चौक : प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या आपत्तीसंदर्भात प्रत्येक विभागाने सतर्क राहून उपाययोजना सुरू कराव्यात, असे निर्देश उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी दिले आहेत. सन २०२६-२७ च्या मान्सून पूर्वतयारीच्या अनुषंगाने, खालापूर येथील नवीन प्रशासकीय कार्यालयात उपविभागीय अधिकारी, कर्जत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी काही सूचना केल्या.

या बैठकीसाठी गट विकास अधिकारी खालापूर संदीप कराड, तालुका कृषी अधिकारी खालापूर, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग खालापूर, पोलीस निरीक्षक खोपोली, खालापूर, रसायनी, मुख्याधिकारी नगर परिषद खोपोली, मुख्याधिकारी नगर पंचायत खालापूर, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ खोपोली, रसायनी, खालापूर यांचे अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी कर्जत, खालापूर यांचे अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी खालापूर, अग्निशामन अधिकारी खोपोली, रसायनी, एमआयडीसी पाताळगंगा यांचे अधिकारी आदी बैठकीस उपस्थित होते.

बैठकीमध्ये उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, कर्जत यांनी दरडग्रस्त गावांमध्ये करण्यात येणाऱ्या उपाययोजना, नियंत्रण कक्ष स्थापन करणे, पूरग्रस्त गावांमधील नागरिकांचे स्थलांतर करणे, आपत्तीची माहिती संबंधित विभागाला तात्काळ कळविणेकामी नियंत्रण कक्ष स्थापन करणे, संभाव्य आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी एसएमएस सुविधा कार्यान्वित करणे, सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोबाईल नंबर नियंत्रण कक्षास सादर करणे, अतिवृष्टीमुळे रस्त्यावर झाड पडणे, घरांची भिंत कोसळणे, पूर येणे, दरड कोसळणे अशा घटना होत असतात, अशा वेळी टॉर्च, चेन सॉ कटर, वूड कटर, इन्फ्लाटेबल लायटिंग टॉवर, जे.सी.बी., पोकलेन मशिन इ. आवश्यक साहित्य तातडीने उपलब्ध होतील याकामी संबंधित मालकांचे संपर्क क्रमांक संकलित करून, आपत्तीकाळात सदर साहित्य शोध व बचाव कार्यासाठी तत्पर ठेवणे, अशा सूचना दिल्या आहेत.



## वावंढळ गावात मायलेकीला मारहाण; सात जणांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

खोटी अफवा पसरवली याचा जाब विचारणाऱ्या आदिती विनायक कांबळे (१९) आणि तिची आई विजया रा. आदिवासी वाडी, वावंढळ, खालापूर यांना सात जणांनी शिवीगाळ करून बेदम मारहाण केल्याची घटना गुरुवारी संध्याकाळी घडली आहे.

आदिती मोंटेरिया विलेज, कलोते येथे कामाला जाते. आजारपणामुळे तिने तीन दिवस सुट्टी घेतली होती. आदितीसोबत काम करणाऱ्या माधुरी वाघमारे, सुनील वाघमारे, अनामिका कांबळे यांनी आदिती आजारी नसून फिरायला गेली, अशी अफवा पसरवली असे आदितीला समजले. जाब विचारण्यासाठी आदिती व तिची आई गेल्या असता माधुरी वाघमारे, सुनील वाघमारे, अनामिका कांबळे, करण कांबळे, अंकिता कांबळे, बैजू कांबळे व माधुरीची आई यांनी आदिती व तिच्या आईला शिवीगाळ व मारहाण केली.

# कर्जत-खोपोली मार्गावर आढळला अज्ञात महिलेचा मृतदेह

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-खोपोली महामार्गावरील पळसदरी परिसरात रस्त्यालगत असलेल्या खड्ड्यात अंदाजे ३५ ते ४० वर्षीय अज्ञात महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतदेहातून तीव्र दुर्गंधी येत असल्याने स्थानिक नागरिकांनी याबाबत कर्जत पोलिसांना माहिती दिली. हा मृतदेह पुरुषाचा की महिलेचा हे सुरुवातीला समजले नाही. मात्र वैद्यकीय पथकाने तपासणी



केल्यावर मृतदेह महिलेचा असल्याचे समजले.

मृत महिलेने कुर्ती व निळ्या रंगाची पँट परिधान केलेली असून मृतदेह सुमारे सात-आठ दिवसांपूर्वीचा असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. तिच्या उजव्या हातात एक बांगडी आढळून आली आहे. माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक मीनल शिंदे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शरद रोकडे, हवालदार लालासाहेब तोरवे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.या महिलेचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? तिची हत्या करण्यात आली का? अथवा तिच्यासोबत कोणता गैरप्रकार झाला आहे का? याचा तपास पोलीस करीत आहेत. मृत महिलेची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असून शवविच्छेदन अहवालानंतर अधिक माहिती स्पष्ट होणार आहे.

## अनाथपणावर मात करीत विशाल झोरे बनला पोलीस

**खोपोली : प्रतिनिधी**

संघर्ष, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर विशाल विनायक झोरे हा मुंबई पोलीस बनला आहे. आईवडील नसतानाही विशालने केलेली मेहनत आणि लक्ष्मण मरगळा यांचे त्याला वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन यामुळे विशाल झोरे मुंबई पोलीस बनला असून त्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. विशाल झोरे याचे मूळ गाव कौलाट (ता. सुधागड) असून त्याची आई विद्या झोरे आणि वडील विनायक झोरे यांच्या अकाली निधनाने विशाल पोरका झाला होता. त्यावेळी विशालच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची आणि बेताची होती. यावेळी विराणी (पेण) येथील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण कोंडू मरगळा यांनी सामाजिक बांधिलकी जपत विशालला आपल्या घरी आणून त्याचे पालकत्व स्वीकारले.

# देऊळवाडीच्या संचिता साळोखेची मुंबई पोलीस दलात निवड; वाजतगाजत मिरवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील किरवली पैकी देऊळवाडी गावची रहिवासी संचिता चंद्रकांत साळोखे हिची मुंबई पोलीस दलात निवड झाली. तिची निवड झाल्याचे समजताच ग्रामस्थांनी शिवमंदिरापासून गावातून तिची वाजतगाजत मिरवणूक काढली. संचिता ही एका रिसॉर्टवर माळी काम करणाऱ्या कामगाराची मुलगी आहे. निवड झाल्याचे कळताच तिच्या आईच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

देऊळवाडी येथील चंद्रकांत साळोखे यांचे षटकोनी कुटुंब आहे. पत्नी सुरेखा, मुली सानिका, संचिता, समिधा, संस्कृती या चार मुली त्यांना आहेत. संचिताचे प्राथमिक शिक्षण किरवली जिल्हा परिषद



शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण कालभैरव माध्यमिक विद्यालयात, बारावीपर्यंतचे शिक्षण अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला कर्जत येथे झाले. तिने वाणिज्य शाखेची पदवी घेण्यासाठी कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश घेतला. मात्र शेवटच्या वर्षाची परीक्षा देण्याच्या वेळीच तिला पोलीस भरतीसाठी जावे लागले म्हणून ती परीक्षेला बसू शकली नाही. प्रहार अकॅडमीचे रुपेश कुडेकर आणि जितेंद्र मोरे यांनी तिला प्रशिक्षण दिले.

पोलीस भरतीला जाण्याच्या दीड महिना आधी तिचा अपघात झाला. त्यात तिच्या पायाला दुखापत झाली. परंतु तिने जिद्द सोडली नाही. इतकेच काय तर तीन दिवस आधी सराव करताना तिच्या दोन्ही पायांच्या गुडघ्यांना जखमा झाल्या होत्या. तरीही तिने त्याची पर्वा न करता सराव सुरू केला. देऊळवाडीतील तिचे नातेवाईक दिनेश बडेकर यांनाही पोलिसात भरती व्हायचे होते, मात्र त्यांना ते शक्य झाले नाही, परंतु त्यांनी संचिताला मार्गदर्शन केले.

## एक तरी छंद जोपासा -राहुल कदम

**अलिबाग : प्रतिनिधी**

शिक्षण आणि व्यवहार यांची सांगड घाला. स्वतःमधील क्षमता ओळखा. वचन द्या, आयुष्यात एक तरी छंद जोपासा, असा सल्ला रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम यांनी विद्यार्थ्यांना दिला.रायगड फोटोग्राफर अँड व्हिडिओग्राफर असोसिएशनशी संलग्न अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन व अश्विनी टीचर्स क्लासेस अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी गुणगौरव सोहळा पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या मुख्य कार्यालयाच्या सभागृहात शनिवारी (दि. ३०) आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम बोलत होते. पी.एन.पी. एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, अलिबागच्या उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, उपाध्यक्ष राकेश दर्पे, सचिव विकास पाटील, सहसचिव अमोल नाईक, खजिनदार विवेक पाटील, सहखजिनदार प्रणेश म्हात्रे, कार्याध्यक्ष सुदेश माळी, सहकार्याध्यक्ष सुबोध घरत, सल्लागार सुरेश खडपे, जितू शिगवण, अश्विनी टीचर्स क्लासेसच्या संचालिका अश्विनी मेहता आदी मान्यवर, गुणवंत विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


विकास पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिम सुतार यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे सदस्य अमर मढवी, विजय पाटील, निलेश दुदम, विराज घरत, निलेश बुरांबे, जयेंद्र वाघमारे, सुमित मालोदे यांनी मेहनत घेतली.




# खालापूर पं.स.च्या मानसी हजारे यांना सेवानिरोप

**चौक : प्रतिनिधी**

"वर्षाताई यांच्या सेवानिवृत्तीचा आजचा दिवस आपल्या सर्वांसाठीच खूप भावनिक आहे. ३९ वर्षांची यशस्वी कारकीर्द पूर्ण करून त्या सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी आपल्या पंचायत समितीसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. सुरुवातीच्या दिवसांपासून ते आजपर्यंत, त्यांचे काम नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा हसरा आणि शांत स्वभाव. कामाच्या ताणातही त्या नेहमी सकारात्मक राहिल्या आणि कठीण प्रसंगातही त्यांनी योग्य मार्गदर्शन केले. त्यांच्याकडून आम्हाला केवळ कामाचे धडे मिळाले नाहीत, तर सहकाऱ्यांशी कसे वागावे हेही शिकायला मिळाले," असे भावपूर्ण प्रतिपादन खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी केले.



खालापूर पंचायत समितीच्या वरिष्ठ सहाय्यक मानसी महेंद्र हजारे या ३९ वर्षांची यशस्वी सेवा करून निवृत्त झाल्या. खालापूर पंचायत समिती अधिकारी, कर्मचाऱ्यांनी निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सभापती कृष्णा पारंगे बोलत होते."आज त्या आपल्या सेवेतून निवृत्त होत असल्या तरी, त्यांच्या आठवणी आणि त्यांचे विचार सदैव आपल्यासोबत राहतील. त्यांनी निवृत्तीनंतर देखील आम्हाला सहकार्य करावे," अशी विनंती उपसभापती भाई शिंदे यांनी करून त्यांना शुभेच्छा दिल्या."तुमची पुढील आयुष्यातील दुसरी इनिंग अतिशय निरोगी, आनंदी आणि समाधानाची जावो," अशी अपेक्षा व्यक्त करताना गटविकास अधिकारी संदीप कराड म्हणाले, "वर्षाताई कार्यालयीन कामाचा उंच आलेख असून दिव्यांगांच्या शासकीय मदतीसाठी मदत केली. कार्यालयीन कामाचे इतिवृत्त कसे लिहावे हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे असून याची दखल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतल्याने त्यांच्या कामाची पावती मिळते."माजी सभापती कांचन पारंगे, जिल्हा परिषद वरिष्ठ अधिकारी पवार, विजय कुरुंगळे, सुधीर जोशी, सुधीर म्हात्रे, कर्मचारी, अधिकारी, मित्र परिवार यांनीही आपली मनोगते व्यक्त करून काही आठवणी, प्रसंग सांगितले. त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल**

४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड

ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com दूर.: ७४००१५२३१६

**दिनांक: ३०.०५.२०२६**

**प्रति,**
**१. श्री. बलराम कृष्णा पाटील**
मु./पोष्टः वहाळ, तालुका पनवेल, जिल्हा रायगड

**विषयः अंतिम स्मरणपत्रः जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये असलेला जंगम वस्तूसाठा हटविण्याकरिता सूचना**

**संदर्भः आमचे संदर्भ क्रमांक ६२/६९/२०२६-२७ दिनांक १४.०५.२०२६ धारण केलेले पत्र**

आपणास माहितच आहे की, आपले खाते दिनांक ३०.०६.२०२० रोजी एनपीए म्हणून घोषित झाले आणि बँकेने सरफेसी कायद्यांतर्गत कारवाई सुरु केली. माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी, अलिबाग यांनी कलम १४ अन्वये दिनांक ०८.१०.२०२५ रोजी आदेश पारित केला; त्यानुसार ॲडव्होकेट न्यायालय आयुक्तांनी दिनांक २४.०१.२०२६ रोजी मालमत्तेचा (तसेच त्यातील जंगम वस्तूंचा) प्रत्यक्ष ताबा घेतला आणि तो बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याकडे सुपूर्द केला. त्यादनुसार, अधिकृत अधिकाऱ्याने दिनांक २४.०१.२०२६ रोजी तारण ठेवलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला. या मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहेः सदनिका क्र. बी-१०१, बी विंग, पहिला मजला, मातृछाया कॉम्प्लेक्स सीएचएस लि., क्षेत्रफळ - ११४२ चौ. फूट, सीटीएस क्र. ११९१ आणि सीटीएस क्र. ११९१/१; पत्ता - पनवेल, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड. पुढे, सदर मालमत्तेची दिनांक १४.०५.२०२६ रोजी लिलावाद्वारे विक्री करण्यात आली.

या संदर्भात, असे निदर्शनास आले आहे की, आम्ही वारंवार स्मरणपत्रे पाठवून आणि बराच कालावधी उलटूनही, आपण अद्यापपर्यंत आपल्या जंगम वस्तूंचा ताबा घेतलेला नाही किंवा त्या हलवलेल्या नाहीत. आम्ही आपल्याला पुन्हा एकदा विनंती करतो की, सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार, सदर मालमत्तेमध्ये पडून असलेल्या आपल्या जंगम वस्तू आपण लवकरात लवकर, मात्र हे पत्र प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आतच तेथून काढून घ्याव्यात; अन्यथा, बँक स्वतःहून सदर सामानाचे स्थलांतर करू शकते आणि अशा स्थलांतरापोटी बँकेला होणारा सर्व खर्च भरण्यास आपणच जबाबदार राहाल. शिवाय, स्थलांतराच्या प्रक्रियेदरम्यान एखादी वस्तू गहाळ झाल्यास किंवा तिला कोणत्याही प्रकारची झीज/नुकसान पोहोचल्यास, त्यासाठी बँक जबाबदार राहणार नाही. याव्यतिरिक्त, सदर वस्तू आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी बँकेला भाडे, सुरक्षा व्यवस्था इत्यादी स्वरूपाचा खर्च करावा लागत आहे; त्यामुळे, सदर वस्तूंचा ताबा घेण्यापूर्वी आपण बँकेने केलेला हा सर्व खर्च परत करावा, अशी आपल्याला विनंती आहे.

कृपया याला **आमचे अंतिम आणि शेवटचे स्मरणपत्र** समजावे.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.**

**संलग्नः**
**१. आमचे संदर्भ क्रमांक ६२/६९/२०२६-२७ दिनांक १४.०५.२०२६ धारण केलेले पत्र**



## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, मौजे आपटी ता. खालापूर, जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक १) श्री. वसंत शंकरराव मोरे २) श्री. जयवंत शंकरराव भोरे ३) श्री. शरद शंकरराव मोरे यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.कं. | सर्व्हे नं | क्षेत्रफळ. हे. आर चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | ३०/१/क | ०-०७-१० | ०.८१ |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्ट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : रिस
दिनांक : ३१/०५/२०२६

**sd/-**
**Adv.Sachin R Chalke**
**B.A LL.B**

Office: 107, Gokul Nagari Building, 1st Floor, Village: Rees. Post. Mohopada, Tal- Khalapur, Dist-Raigad, Maharashtra, Pin No.410222, Mob:8180823040
Email:srchalke1979@gmail.com

# विज्ञान आणि अध्यात्माच्या संगमातून कर्करोगावर मात करण्याचा संकल्प –राज्यपाल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विज्ञान मानवी शरीराला बरे करण्याचे कार्य करते, तर अध्यात्म मन, आत्मा आणि जगण्याची इच्छाशक्ती बळकट करण्याचे सामर्थ्य प्रदान करते. विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय साधला गेल्यास जीवनाकडे पाहण्याचा अधिक समग्र (होलिस्टिक) दृष्टिकोन विकसित होतो, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.

खारघर येथील इस्कॉन मंदिरात आयोजित 'होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट' (HCHR) या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी इस्कॉन नवी मुंबईचे मंदिराध्यक्ष डॉ. सूर दास, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, भक्तिवेदांत कॉलेजचे संचालक डॉ. व्ही. सेवक दास, कॅल्विन सेउंगवॉन यी, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, डॉ. विक्रम गोटा, डॉ. अमित जोशी, डॉ. रजनीश कामत, डॉ. अविनाश टिप्पणी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील संशोधक, तज्ज्ञ डॉक्टर, कर्करोग रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले की,




खारघर येथील इस्कॉन मंदिर हे केवळ दगड, सिमेंट आणि वाळूने उभारलेले बांधकाम नसून ते श्रद्धा, भक्ती आणि लाखो लोकांच्या प्रार्थनांचे प्रतीक आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत या मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडला होता. स्वामी विवेकानंदांप्रमाणेच 'भगवद्गीते'चा वैश्विक संदेश जगभर पोहचविणाऱ्या इस्कॉनचे संस्थापक–आचार्य परमपूज्य ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांच्या कार्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

भगवद्गीतेतील 'आत्मा अमर आहे' हा संदेश दुःख, संकट आणि निराशेच्या काळात मानवाला धैर्य, आशा आणि मानसिक बळ प्रदान करतो, असे सांगून राज्यपालांनी अध्यात्माच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.

कर्करोग हे आज मानवजातीसमोरील एक गंभीर आरोग्य आव्हान असून जगभरात दरवर्षी सुमारे दोन कोटी, तर भारतात १४ लाखांहून अधिक नवीन कर्करोग रुग्णांची नोंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. आधुनिक वैद्यकशास्त्रामुळे उपचार पद्धतीत मोठी प्रगती झाली असली तरी कर्करोगाचा परिणाम रुग्णांच्या मानसिक, भावनिक आणि कौटुंबिक आयुष्यावरही होत असतो. 'होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट' हा उपक्रम या सर्व पैलूंचा विचार करून रुग्णांना सर्वांगीण आधार देणारा ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

हा उपक्रम भारताच्या समृद्ध 'आयुष' परंपरेवर आधारित असून त्यामध्ये आयुर्वेद, योग, ध्यान आणि वैदिक तत्त्वज्ञानाचा समावेश आहे. टाटा मेमोरियल सेंटरच्या 'ॲक्टरेक' (ACTREC) येथील आयुष केंद्राच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेला हा कार्यक्रम कर्करोग रुग्ण, कर्करोगमुक्त झालेले रुग्ण (सर्व्हायव्हर्स) तसेच त्यांच्या नातेवाइकांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

देशभरातून मोठ्या संख्येने कर्करोग रुग्ण उपचारासाठी मुंबई आणि नवी मुंबई येथे येतात. अशा रुग्णांसाठी आणि त्यांच्या नातेवाइकांसाठी कर्करोग रुग्णालयांच्या परिसरात सुसज्ज व परवडणाऱ्या निवास सुविधांची निर्मिती करणे आवश्यक असल्याचे सांगून यासाठी कॉर्पोरेट क्षेत्राने तसेच इस्कॉनसारख्या सामाजिक व आध्यात्मिक संस्थांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असे आवाहनही राज्यपालांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इस्कॉन नवी मुंबईचे मंदिर अध्यक्ष डॉ. सूर दास यांनी केले.

# रानसई धरणाची पाणी पातळी खालावली

## एमआयडीसीकडून जूनअखेरपर्यंत पुरवठ्याचे नियोजन

**उरण : प्रतिनिधी**



मे महिन्यातील वाढत्या तापमानामुळे रानसई धरणातील पाणीसाठा कमी होत आहे. त्यामुळे धरणातून जूनअखेरपर्यंत पुरवठा करण्याचे नियोजन एमआयडीसीने केले आहे. रानसई धरणाची पाणी पातळी शुक्रवारी ८६ फुटांवर होती, तर गेल्या वर्षी याच दिवशी ही पातळी ९६ फूट इतकी होती, मात्र त्यावेळी मे महिन्यात पावसाने सुरुवात केली होती, पण यंदा पाणी पातळी अधिक घटल्याने उरणकरांना पावसाची प्रतीक्षा आहे.

रानसई धरणातील पाणी साठवण क्षमता गेली अनेक वर्षे वाढत नसल्याने उरणच्या नागरिकांवर पाणीकपातीचे संकट वाढू लागले आहे. धरणाची पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने या धरणातून पावसाळ्यातील साडेतीन महिन्यांचे लाखो लिटर पाणी वाया जाते. त्यामुळे येथील नागरिकांना ऑक्टोबर–नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणीकपातीचा सामना करावा लागतो.

दरम्यान, उरण तालुक्यातील नागरिकांना आणि येथील उद्योगांसाठी लागणारे पाणी एमआयडीसीच्या रानसई धरणातून पुरविले जाते. उरणकरांना दररोज ४१ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे, मात्र एमआयडीसीकडे केवळ ३० दशलक्ष लिटर पाणी असल्याने दररोज १० दशलक्ष लिटर पाणी कमी पडते. त्यामुळे जून महिन्यापर्यंत पाणीपुरवठा करता यावा यासाठी पाणीकपात केली जाते.

**रानसई धरणातील पाणीसाठा ८६ फुटांवर आला आहे. नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी या पाण्याचे नियोजन केले जात आहे. त्यानुसार ३० जूनपर्यंत पाणीपुरवठा करता येणार आहे, मात्र या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करून पाणी जपून वापरावे.**

**–ग्यानदेव सोनवणे,**
उपअभियंता, एमआयडीसी, उरण

# खारघर-फणसवाडी रस्त्याचे डांबरीकरण काम अखेर सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

आरबीआय मेट्रो स्टेशनपासून फणसवाडी आणि चाफेवाडी या आदिवासी पाड्यांकडे जाणाऱ्या पाच किलोमीटर अंतराच्या मुख्य रस्त्यापैकी दोन किलोमीटर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम अखेर पनवेल महानगरपालिकेकडून सुरू करण्यात आले आहे. 'सजग नागरिक मंच नवी मुंबई' आणि 'खारघर हिल्स वेलफेअर असोसिएशन' यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आलेले हे यश असून, कामाची सुरुवात केल्याबद्दल नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

फणसवाडी आणि चाफेवाडी या दुर्गम भागातील आदिवासी बांधवांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून गेल्या अनेक वर्षांपासून देखभालीअभावी याची प्रचंड दुरवस्था झाली होती. या रस्त्यावरून प्रवास करताना विशेषतः दुचाकीस्वारांच्या जीवावर बेतत होते. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सजग नागरिक मंचाने १ एप्रिल २०२५ रोजी पहिले निवेदन दिले होते. त्यानंतर ११ सप्टेंबर २०२५ रोजी स्मरणपत्र पाठवून पनवेल पालिका आयुक्त आणि सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन पत्रव्यवहार केला होता.

सजग नागरिक मंचाने पनवेल महानगरपालिका आयुक्तांकडे मागणी केली आहे की, केवळ दोन किलोमीटरवरच न थांबता संपूर्ण पाच किलोमीटर रस्त्याचे काम तातडीने मंजूर करावे.



**अत्यंत दयनीय अवस्था झालेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे स्वागतच आहे. अपेक्षा एवढीच आहे की रस्त्याचे काम कंत्राटात नमूद निकषानुसार दर्जेदार व्हावे. रस्ता पावसाच्या पाण्यामुळे खराब होऊ नये यासाठी रस्त्याच्या कडेला पाणी वाहून जाण्यासाठी व्यवस्थादेखील करावी.**

**–सुरेश थोरात, सदस्य,**
खारघर हिल्स वेल्फेअर असोसिएशन

## निवडक

### शस्त्रधारी विद्यार्थ्याला पनवेल पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल :** तालुक्यातील अमेटी युनिव्हर्सिटी, भातान येथे धारदार तलवार घेऊन आलेल्या विद्यार्थ्याला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे. येथील लॉ स्टुडंट तुषार सिंग हा त्याच्या सोबत ७ ते ८ मुलांना घेऊन तीन कारने कॉलेजमध्ये आला होता. गैरकायद्याची मंडळी जमवून, शस्त्र अधिनियमाचे उल्लंघन करून आरोपी तुषार सिंग याने त्याच्या उजव्या हातात तलवार हे शस्त्र बेकायदेशीरपणे स्वतःजवळ बाळगले होते. अमेटी युनिव्हर्सिटी, भातान येथे शिक्षण घेणाऱ्या अमन खान यास शिवीगाळ करून मारण्याची धमकी देत कॉलेजमध्ये दहशत निर्माण करीत होता. या घटनेमुळे परिसरात घबराट निर्माण झाली होती. दरम्यान, याबाबतची माहिती वपोनि गजानन घाडगे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथकाने तेथे जाऊन आरोपीसह इतर दोघांना ताब्यात घेतले आहे.

### महिलेचा विनयभंग; दोघांविरोधात गुन्हा

**पनवेल :** महिलेच्या घरात शिरून तिचा विनयभंग करून "तुझा बलात्कार करू व तुम्हा सर्वांना मारून टाकू" अशी धमकी दिल्याप्रकरणी अफजल खान आणि सिराज खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात घबराट निर्माण झाली होती.

पीडित महिलेच्या घरी येऊन आरोपींनी शिवीगाळ केली आणि "तू काही बोललीस तर तुला मारून टाकेल" असे बोलून आरोपी अफजल खान याने महिलेसोबत जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला आणि सिराज खानने त्या महिलेचा विनयभंग केला. यावेळी "ओरडलीस तर आम्ही तुला उचलून नेऊन तुझ्यावर बलात्कार करू आणि तुम्हा सर्वांना मारून टाकू" अशी धमकी दिली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### ४१ लाख ४६ हजारांची फसवणूक

**पनवेल :** सदनिका न देता पैसे परत न केल्याने आयुष अग्रवाल, विनय अग्रवाल आणि देवेंद्र केडिया यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरेंद्र पाडवी हे रोडपाली येथे राहत असून त्यांनी आयुष अग्रवाल यांच्यामार्फत बालाजी सिंफनी, सुकापूरमधील सदनिका बुक केली होती. त्यांनी या सदनिकेसाठी नऊ लाख एक हजार रुपये ऑनलाइन आणि ३२ लाख ४५ हजार रुपये रोख असे एकूण ४१ लाख ४६ हजार ६३० रुपये बिल्डर आणि मॅनेजर यांना दिले, मात्र यातील आरोपींनी संगनमत करून त्यांच्याकडून रक्कम घेतली आणि त्यांना सदनिका न देता त्यांचे पैसेदेखील परत केले नाहीत. दरम्यान, याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# कंटेनर बंदर जेएनपीएचा ३७वा स्थापना दिन उत्साहात

## मंत्री सोनोवाल यांची उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) आपला ३७वा स्थापना दिन केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा केला. कार्यक्रमादरम्यान जेएनपीएच्या प्रवासाची, उल्लेखनीय कामगिरीची, अत्याधुनिक पायाभूत सुविधांची, हरित उपक्रमांची तसेच भविष्यातील विकास आराखड्याची माहिती देणारी कॉर्पोरेट चित्रफीत मान्यवरांसमोर प्रदर्शित करण्यात आली.

यानंतर पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते जेएनपीएच्या भागधारकांचा विशेष गौरव करण्यात आला. आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये जेएनपीएने आतापर्यंतची सर्वाधिक ८.१७ दशलक्ष टीईयू कंटेनर हाताळणी नोंदवत ११.९४ टक्क्यांची भक्कम वाढ साध्य केली. तसेच एकूण कार्गो हाताळणीतही १०२ दशलक्ष मेट्रिक टन ही विक्रमी कामगिरी नोंदविण्यात आली. बंदराच्या विकासात आणि कार्यप्रणालीतील उत्कृष्टता साध्य करण्यात दिलेल्या उल्लेखनीय योगदान आणि समर्पित सेवेसाठी विविध भागधारकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते जेएनपीएच्या नव्या अभिनव उपक्रमाचे 'निविदा'चे उद्घाटन करण्यात आले. जेएनपीए आणि एआय ट्रान्सम्यूट सोल्यूशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आलेले 'निविदा' हे भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित निविदा मूल्यांकन प्रणाली आहे. तसेच स्वदेशी व्हेसल ट्रॅफिक सर्व्हिसेस (आयव्हीटीएस) प्रणालीचेही उद्घाटन करण्यात आले. या प्रणालीच्या स्थापनेद्वारे व्यवस्थापनाद्वारे आणि प्रशिक्षण उपक्रमांद्वारे स्वदेशी सागरी तंत्रज्ञान क्षमतांना अधिक बळकटी देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.




पारितोषिक वितरण समारंभात केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते जेएनपीएचे भागधारक आणि कर्मचारी यांचा बंदराच्या विकासात तसेच कार्यप्रणालीतील उत्कृष्टता साध्य करण्यासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदान आणि समर्पित सेवेसाठी गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, "जेएनपीएच्या ३७ व्या स्थापना दिनानिमित्त मी जेएनपीए परिवारातील अध्यक्ष, उप–अध्यक्ष, अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि सर्व भागधारकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. राष्ट्राच्या प्रगतीमध्ये त्यांच्या समर्पित योगदानाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जेएनपीएची सातत्याने परिवर्तन आणि प्रगती साधण्याची धडपड विशेष उल्लेखनीय आहे. आज करण्यात आलेले सामंजस्य करार (एमओयू) तसेच नव्या तंत्रज्ञान आणि उपक्रमांचे उद्घाटन ही त्याच प्रगतिशील विचारसरणीची साक्ष आहे. अचूकता, वेग आणि बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची असलेल्या या क्षेत्रात, लहान पण लक्ष केंद्रित सुधारणादेखील संपूर्ण सागरी आणि लॉजिस्टिक्स परिसंस्थेवर मोठा सकारात्मक परिणाम घडवू शकतात."ते पुढे म्हणाले, "मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताचे सागरी क्षेत्र अभूतपूर्व प्रगती आणि आधुनिकीकरणाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. देशाला जागतिक सागरी महासत्ता बनविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणारे महत्त्वपूर्ण उपक्रम या परिवर्तनात अत्यंत निर्णायक ठरत आहेत. आगामी काळात जेएनपीए कार्यक्षमता, शाश्वतता, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि ग्राहककेंद्री सेवांमध्ये नवे मानदंड प्रस्थापित करत राहील, असा मला पूर्ण विश्वास आहे."

वर्धापन दिन सोहळ्यात विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पायाभूत सुविधांचा विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम, शाश्वतता आणि भागधारकांमधील सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या जेएनपीएच्या वचनबद्धतेचा हा महत्त्वपूर्ण भाग होता. यापैकी एक सामंजस्य करार जेएनपीए आणि सीएसआयआर – नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट (नीरी) यांच्यात पर्यावरणीय नियोजन, मूल्यांकन, प्रदूषण नियंत्रण, हवामान अनुकूलता आणि ईएसजी उपक्रमांसाठी करण्यात आला. या करारामुळे शाश्वत आणि पर्यावरणीय नियमांचे पालन करणाऱ्या बंदर विकासाला चालना देण्यासाठी जेएनपीए आणि सीएसआयआर–नीरी यांच्यात संस्थात्मक सहकार्याची प्रभावी यंत्रणा निर्माण होणार आहे. तसेच जेएनपीए आणि जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊस (जेएनसीएच) चे सीमाशुल्क आयुक्त (सामान्य) यांच्यात नाशवंत मालाची सुरक्षित, वैज्ञानिक, पर्यावरणीय नियमांचे पालन करणारी आणि निश्चित कालमर्यादेत विल्हेवाट लावण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या प्रक्रियेत जैवविघटन, कंपोस्टिंग आणि बायोगॅस निर्मितीसारख्या ऑन–साइट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. वैधानिक आणि पर्यावरणीय निकषांचे पालन करत अशा मालाची कार्यक्षम विल्हेवाट सुनिश्चित करण्यासाठी जेएनपीए आणि जेएनसीएच यांच्यात सहकार्याची प्रभावी यंत्रणा या कराराद्वारे निर्माण करण्यात आली आहे. जेएनपीए आणि कॉन्व्हर्जन्स एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड (सीईएसएल) यांच्यात जेएनपीए परिसरात इलेक्ट्रिक वाहनांसाठी (ईव्ही) चार्जिंग स्टेशन आणि बॅटरी स्वॅपिंग स्टेशन (बीएसएस) उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रोत्साहन, शाश्वत लॉजिस्टिक्स व्यवस्था आणि हरित पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात येणार आहे.

जेएनपीए आणि आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सल्टन्सी लिमिटेड यांच्यात एनएसएफटी, एनएसआयसीटी, बीएमसीटी आणि एनएसआयजीटी टर्मिनल्स येथे शोर पॉवर सप्लाय प्रणालीच्या विस्तारासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) सेवा पुरविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. तसेच एनर्जी एफिशियन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (ईईएसएल) आणि जेएनपीए यांच्यातही ऊर्जा कार्यक्षमता, सौर ऊर्जा प्रकल्प, बॅटरी ऊर्जा संचय प्रणाली (बीईएसएस), प्रकाश व्यवस्था आणि संबंधित पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. हा प्रकल्प जेएनपीएच्या इमारती, बंदर परिसर आणि वसाहतींमध्ये पीएमसी पद्धतीद्वारे राबविण्यात येणार आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास (आयआयटी मद्रास) आणि जेएनपीए यांच्यात बंदर आणि सागरी क्षेत्रासाठी संयुक्त तांत्रिक उपाययोजना विकसित करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या सहकार्याअंतर्गत मॉडेलिंग, सिम्युलेशन, ड्रेजिंग, नेव्हिगेशन, मॉनिटरिंग सिस्टिम्स, डिजिटल ट्विन्स, जस्ट–इन–टाइम (जेआयटी), आयव्हीटीएस तसेच जेएनपीए आणि संबंधित सागरी सुविधांसाठी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

यावेळी जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, भा.प्र.से. म्हणाले, "जेएनपीएच्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त मी आमचे सर्व भागधारक, व्यापार भागीदार, टर्मिनल ऑपरेटर्स, संचालक मंडळाचे सदस्य, कर्मचारी आणि संपूर्ण बंदर समुदायाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांच्या सातत्यपूर्ण विश्वास, सहकार्य आणि सहभागामुळेच जेएनपीएचा विकास प्रवास अधिक सक्षम आणि यशस्वी झाला आहे. जागतिक व्यापार केंद्रामध्ये होत असलेले बदल आणि नव्या आर्थिक संधींच्या पार्श्वभूमीवर जेएनपीएची जबाबदारी अधिक महत्त्वपूर्ण होत आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, संस्थात्मक क्षमता, प्रगतिशील दृष्टीकोन आणि सर्व भागधारकांच्या सामूहिक बांधिलकीच्या बळावर जेएनपीए आगामी काळात केवळ सागरी क्षेत्राच्या विकासालाच नव्हे, तर भारताच्या व्यापक विकास प्रवासालाही नवी दिशा देत राहील." सागरी, लॉजिस्टिक्स, व्यापार आणि बंदर क्षेत्रातील अनेक भागधारकांनीही या प्रसंगी आपल्या शुभेच्छा आणि कौतुक व्यक्त केले. भारताच्या सागरी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी तसेच देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जेएनपीएने दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची त्यांनी प्रशंसा केली.

जेएनपीए कर्मचाऱ्यांचा सत्कार करून कार्यक्रमाची सांगता जेएनपीएचे उपाध्यक्ष रविश कुमार सिंग, भा.रे.वा.से. यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. त्यांनी मान्यवर, संचालक मंडळाचे सदस्य, भागधारक, कर्मचारी तसेच सर्व संबंधित भागीदारांचे जेएनपीएच्या उल्लेखनीय प्रवासात दिलेल्या सातत्यपूर्ण सहकार्य आणि सहभागाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. मध्य पूर्वेतील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मार्गदर्शनानुसार जेएनपीएने हा कार्यक्रम आणि त्यासंबंधित सर्व उपक्रम अत्यंत जबाबदारीने तसेच सर्व निर्धारित नियम, प्रोटोकॉल आणि नियामक मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून पार पाडले. २०२५–२६ दरम्यान सर्वाधिक कंटेनर हाताळणी करणारे टर्मिनल म्हणून एम/एस भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्स प्रा. लि. (बीएमसीटी) यांना गौरविण्यात आले.

# रायगडातील पर्यटनस्थळांवर पर्यटकांची गर्दी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मे महिन्याच्या सुटीचा शेवट गोड करण्यासाठी रायगडच्या समुद्रकिनाऱ्यांना पर्यटकांनी पसंती दिली आहे. जिल्ह्यातील समुद्रकिनारे पुन्हा एकदा पर्यटकांच्या उत्साहाने फुलून गेले आहेत. जिल्ह्यातील इतर प्रमुख पर्यटनस्थळांवरही पर्यटकांनी गर्दी केली आहे.

अलिबाग, किहीम, नागाव, काशिद, मुरूड, दिवेआगर आणि हरिहरेश्वर या समुद्रकिनारी पर्यटनस्थळांवर पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे. दुपारच्या उन्हातही अनेक पर्यटक समुद्राच्या पाण्यात डुंबत उष्णतेपासून दिलासा मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसून आले.

जलक्रीडा उपक्रम बंद ठेवण्यात आले आहेत. तरीही समुद्रकिनाऱ्यांवर फिरणे, सूर्यास्ताचा आनंद घेणे, समुद्राच्या लाटांमध्ये खेळणे आणि स्थानिक खाद्यपदार्थांची चव चाखणे याकडे पर्यटकांचा अधिक कल दिसून आला.

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे हॉटेल, रिसॉर्ट, होमस्टे तसेच लॉजिंग व्यवसायालाही मोठा फायदा झाला आहे.

अलिबाग, नागाव, काशिद आणि मुरूड परिसरातील अनेक हॉटेल्स हाऊसफुल होती. पोलीस आणि स्थानिक प्रशासनाकडून प्रमुख पर्यटनस्थळांवर सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेवर विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे.

पर्यटक दाखल झाल्याने रायगड जिल्ह्यातील अनेक प्रमुख मार्गांवर वाहतूक कोंडी झाली होती. मुंबई-गोवा महामार्ग, अलिबाग-वडखळ मार्ग तसेच माणगाव-पुणे मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अलिबाग-वडखळ मार्गावर वडखळ ते पेझारीदरम्यान वाहनांची रांग लागल्याने वाहतूक संथ गतीने सुरू होती.





# ‘इस्रो’भेटीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषदेत सत्कार



**नागोठणे : बातमीदार**

गुरूकुल राज्यस्तरीय शालेय स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत रायगड जिल्ह्यातील चार गुणवंत विद्यार्थ्यांची इस्रो संशोधन भेटीसाठी निवड झाल्याने जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विद्यार्थ्यांचा नुकताच रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथे शिक्षण व आरोग्य सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

इस्रो संशोधन भेटीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सार्थक सुहास माने (इयत्ता ७ वी, सीकेटी इंग्लिश मीडियम स्कूल, न्यू पनवेल), विनीत विनोद कापसे (इयत्ता ८ वी, द.ग. तटकरे माध्यमिक विद्यालय, कोलाड), साई योगेश म्हात्रे (इयत्ता ७ वी, रा. जि. शाळा पिगोंडे, नागोठणे) व शुभ्रा सुधीर शिंदे (इयत्ता ७ वी, ग. बा. वडेर हायस्कूल, पाली) यांचा समावेश आहे.

यावेळी सभापती वैकुंठ पाटील यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच भाजप रोहा तालुका शिक्षण सेल प्रमुख अशोक अहिरे व त्यांच्या संपूर्ण टीमच्या कार्याचेही कौतुक केले.

या सत्कार समारंभास भाजप नेत्या गीता पालरेचा, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, रोहा तालुका शिक्षण सेल प्रमुख अशोक अहिरे, महिला मोर्चा रोहा अध्यक्ष अपर्णा सुटे, सोनाली पडवळ, पल्लवी माने, अनिल वाघ, सोशल मीडिया तालुका अध्यक्ष अनिल खंडागळे तसेच संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व पालक उपस्थित होते.

# श्रीवर्धनला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी पुन्हा फुटली!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी जसवली ते आराठीदरम्यान पुन्हा एकदा फुटली. त्यामुळे पाण्याच्या पुरवठ्यावर परिणाम होत आहे.



श्रीवर्धन शहरातील समुद्राकडच्या भागामध्येच म्हणजे आगरपट्टयामध्ये विहिरींच्या पाण्याची चव मचूळ आहे, तर गावातील काही भागांमध्ये विहिरींचे पाणी गोड आहे. अंदाजे पन्नास वर्षांपूर्वी श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी रानवली या ठिकाणी पाझर तलाव बांधण्यात आला. या पाझर तलावापासून श्रीवर्धन शहराच्या जवळ असलेल्या आराठी गावापर्यंत कास्टिंग मेटलच्या पाईपने पाणी आणून साठवण टाकीमध्ये सोडले जात होते व त्यापुढे सर्वत्र पीव्हीसी पाईपलाईन टाकून शहराला पाणीपुरवठा करण्यात येत होता, मात्र कास्टिंग मेटलचे पाईप जुने झाल्यामुळे रानवलीच्या पाझर तलावाजवळ जलशुद्धीकरण प्रकल्प व संपूर्ण जलवाहिन्या बदलण्याचे काम हाती घेण्यात आले होते. या सर्व प्रकल्पासाठी जवळजवळ २० कोटींपेक्षा जास्त पैसे खर्च करण्यात आले.

जलवाहिन्या दुरुस्त करण्यासाठी नगर परिषदेचा अतिरिक्त निधी खर्च होत असल्याने नगर परिषदेचा निधी अपुरा पडत असल्याचे पहायला मिळते. या कामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून श्रीवर्धनमधील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा होईल यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली जात आहे.

# कानसई गावची पारंपरिक रिगवणी उत्साहात

**नागोठणे : बातमीदार**

कानसई गावची दर तीन वर्षांनी येणारी पारंपरिक रिगवणी यंदाही मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात झाली. या प्रथेनुसार संपूर्ण गाव एक दिवसासाठी आपली घरे सोडून गाई, गुरे, म्हशी, कुत्रे, मांजरे, कोंबड्या व इतर पाळीव प्राण्यांसह जवळील वनराई व आंबराई परिसरात जाऊन सुमारे १२ तास मुक्काम करतो. या निमित्ताने नातेवाईक, आप्तेष्ट व सगे-सोयरे मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंदोत्सव साजरा करतात.




या संदर्भात गावातील उच्चशिक्षित तरुण नागेश पवार यांनी या परंपरेमागील इतिहास उलगडून सांगितला. पूर्वीच्या काळात गावात साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरत असत. उन्हाळ्याच्या दिवसांत कोंबड्या तसेच गाई, गुरे व म्हशींनाही विविध रोगांचा प्रादुर्भाव होत असे. या संकटांवर मात करण्यासाठी संपूर्ण गावकरी कुटुंब आणि पाळीव प्राण्यांसह गावाबाहेरील गवळगतच्या वनराईत जाऊन काही काळ वास्तव्यास राहत.

या काळात संपूर्ण गावाच्या वतीने गावदैवत श्री काळभैरव यांची विधिवत पूजा-अर्चा करून गाऱ्हाणे मांडले जाते. गावावर आलेली संकटे, रोगराई आणि आपत्ती दूर व्हाव्यात यासाठी प्रार्थना केली जाते. याच श्रद्धा आणि परंपरेतून रिगवणीची प्रथा उदयास आली असून ती आजही जतन करण्यात येत आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक पांडुरंग पवार यांनी सांगितले की, ही परंपरा पूर्वी तब्बल आठवडाभर चालत असे, मात्र काळानुरूप बदल होत गेल्याने आता एक दिवस ही प्रथा पाळली जाते. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे पशू-पक्षी व माणसांमध्ये पूर्वीसारखी रोगराई राहिलेली नाही. तरीदेखील पूर्वजांची परंपरा जपण्याच्या उद्देशाने गावकरी आजही रिगवणीचे आयोजन करतात.

यावेळी गावातील पवार, ढाणे, हारपाळ, काते, शिंदे, तटकरे आदी कुटुंबे आपल्या नातेवाईकांना आमंत्रित करून त्यांचा आदरातिथ्याने सत्कार करतात व भोजनाची व्यवस्था करतात. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ धार्मिक विधी न राहता सामाजिक एकोपा, नातेसंबंध दृढ करणारा आणि सांस्कृतिक वारसा जपणारा उत्सव बनतो. संपूर्ण कुटुंब, नातेवाईक आणि गावकरी एकत्र येण्याचा आनंद काही वेगळाच असतो.

# जिल्हाधिकारी जावळे यांची खरबाची आदिवासीवाडीत भेट; ग्रामस्थांशी संवाद



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी माणगाव तालुक्यातील गांगवली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या खरबाची आदिवासीवाडीला सदिच्छा भेट देत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अभिनव “संवाद सेतू अर्थात हितगुज” उपक्रमांतर्गत खरबाची वाडी आदिवासी वाडीतील नागरिक आणि विविध विभागांच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद होता तसेच “जनजातीय गरिमा दिवस” आणि “सबसे दूर, सबसे पहले” अभियानाच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांशी थेट संवाद साधण्यात आला.

यावेळी माणगावचे उपविभागीय अधिकारी श्री. सानप, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभागाच्या तेजस्विनी गलांडे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, आरोग्य अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, आरोग्य सहाय्यक तसेच विविध विभागांचे क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी वाडीतील आदिवासी बांधव, महिला आणि मुलांशी संवाद साधून त्यांच्या त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यामुळे सर्वजण भारावून गेले. त्यांनी आपल्या समस्या सोडवून दिलासा देण्याची मागणी केली. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कार्यवाहीचे आश्वासन दिले.

# पाली येथील शिक्षक चंद्रशेखर राऊत यांचा महाराष्ट्र ते देवभूमी उत्तराखंड दुचाकी प्रवास

**पाली : प्रतिनिधी**

केवळ पर्यटन किंवा साहस म्हणून नव्हे, तर विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, संस्कृती आणि अध्यात्म प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगता यावे या उद्देशाने पाली (ता. सुधागड, जि.रायगड) येथील आत्मोन्नती विद्यामंदिर, जांभुळपाडाचे इतिहास विषय शिक्षक चंद्रशेखर राऊत यांनी तब्बल चार हजार किलोमीटरचा मोटरसायकल प्रवास करत देवभूमी उत्तराखंड गाठले. सहा राज्यांतून केलेला हा प्रवास त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव ठरला असून या प्रवासातून त्यांनी निसर्ग, इतिहास, संस्कृती आणि माणुसकीचे विविध रंग जवळून अनुभवले.



महाराष्ट्रातील पाली येथून सुरू झालेला हा प्रवास गुजरात, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश मार्गे उत्तराखंडपर्यंत पोहोचला. गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा या शहरांमधील स्वच्छता, रुंद रस्ते, शिस्तबद्ध वाहतूक आणि नागरिकांचे आदरातिथ्य यांनी त्यांना विशेष प्रभावित केले.

यानंतर राजस्थानातील बाडमेर, जोधपूर, जयपूर आणि उदयपूर या ऐतिहासिक शहरांनी त्यांना जणू इतिहासाच्या पानांतच नेऊन ठेवले. भव्य किल्ले, राजवाडे, वाळवंटातील अथांग शांतता, रंगीबेरंगी संस्कृती आणि राजेशाही वैभव अनुभवताना इतिहास शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना सांगण्यासाठी अनेक जिवंत संदर्भ त्यांनी मनात साठवून ठेवले. जोधपूरचा मेहरानगड किल्ला, जयपूरची ऐतिहासिक वास्तुकला आणि उदयपूरचे सरोवरांचे सौंदर्य यांनी प्रवास अधिक समृद्ध केला.

हरियाणा, नोएडा, गुरुग्राम, सोनीपत आणि दिल्ली परिसरातून प्रवास करताना आधुनिक भारताचा बदलता चेहरा त्यांनी अनुभवला. उंच इमारती, वेगवान जीवनशैली, आधुनिक तंत्रज्ञान आणि विकसित होत असलेली शहरे पाहताना देशातील प्रगतीचे चित्र जवळून अनुभवायला मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रवासातील सर्वात भावनिक आणि आत्मिक टप्पा होता तो उत्तराखंडचा. हिमालयाच्या कुशीत वसलेली ऋषिकेश, हरिद्वार, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग, चोपटा, केदारनाथ, बद्रीनाथ आणि तुंगनाथ ही स्थळे त्यांच्या मनावर कायमची कोरली गेली.

हरिद्वार येथे प्रथमच गंगेचे दर्शन घेताना आलेला रोमांच, ऋषिकेशमधील अध्यात्मिक शांतता, देवप्रयाग येथे भागीरथी आणि अलकनंदेच्या संगमाचे अप्रतिम दृश्य, रुद्रप्रयागचा ऐतिहासिक संदर्भ आणि चोपटाचे निसर्गरम्य सौंदर्य यामुळे हा प्रवास अधिक संस्मरणीय ठरला. ‘मिनी स्वित्झर्लंड’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चोपटामधील हिरव्यागार दऱ्या, धुक्याने वेढलेले पर्वत आणि हिमालयाचे भव्य दर्शन पाहताना निसर्गाची खरी ताकद जाणवल्याचे त्यांनी सांगितले.

केदारनाथ आणि बद्रीनाथ येथे पोहचताना हिमालयीन घाटरस्त्यांवरील कठीण प्रवास, थंडी, पाऊस आणि अवघड वळणे यांचा सामना करावा लागला. मात्र प्रत्येक संकटानंतर मिळणारे निसर्गाचे अद्भुत दृश्य आणि भाविकांची श्रद्धा यामुळे सर्व थकवा दूर होत असल्याचा अनुभव त्यांनी व्यक्त केला. तुंगनाथ मंदिर परिसरातील शांतता आणि हिमालयातील सूर्योदय हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात सुंदर क्षणांपैकी एक ठरला.

या संपूर्ण प्रवासात अनेक अनोळखी लोकांनी दिलेली मदत, चहाच्या टपरीवरील संवाद, रस्त्यात भेटलेले प्रवासी आणि स्थानिकांचे प्रेम यामुळे “भारत हा विविधतेत एकता जपणारा देश आहे” याची प्रचिती आल्याचे राऊत यांनी सांगितले.

“हा प्रवास फक्त किलोमीटरचा नव्हता; तो स्वतःला ओळखण्याचा प्रवास होता. रस्ते संयम शिकवत होते, डोंगर संघर्ष शिकवत होते आणि प्रत्येक नवीन माणूस माणुसकी शिकवत होता,” अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्ष अनुभवातून इतिहास आणि भूगोल समजावून सांगण्यासाठी अशा प्रवासांची गरज असल्याचे मतही त्यांनी मांडले. त्यांच्या या साहसी आणि प्रेरणादायी प्रवासाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# जानेवारी ते मेदरम्यान वातानुकूलित उपनगरी गाडीने १.५० कोटी प्रवाशांना सेवा

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या वातानुकूलित उपनगरी सेवांमध्ये २६ जानेवारी ते २० मे २०२६ या कालावधीत २०२५ च्या याच कालावधीच्या तुलनेत प्रवासी संख्येत मोठी वाढ दिसून आली आहे, जी मुंबईतील वातानुकूलित उपनगरीय प्रवासाची वाढती लोकप्रियता अधोरेखित करते. या कालावधीतील वातानुकूलित उपनगरी सेवांच्या आकडेवारीनुसार २०२६मध्ये प्रति सेवेमागे सरासरी १६६४ प्रवाशांनी प्रवास केला, जो २०२५मधील प्रति सेवेमागे सरासरी १४७४ प्रवाशांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या जास्त आहे. हे प्रति सेवेमागे प्रवास करणाऱ्या सरासरी प्रवासी संख्येत १२.९% वाढ दर्शवते.

प्रवाशांच्या संख्येत झालेली ही वाढ सेवांमध्ये झालेल्या भरीव वाढीसोबतच साध्य झाली आहे. मध्य रेल्वेने यंदा २६ जानेवारी ते २० मे या कालावधीत ८,९९१ वातानुकूलित लोकल सेवा चालवल्या, जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील ६,८३४ सेवांच्या तुलनेत ३१.६% नी अधिक आहे.

सेवांमध्ये झालेल्या वाढीमुळे दैनंदिन सरासरी प्रवासी संख्या २०२५मधील ८७,५९६वरून २०२६मध्ये १,३०,०७५पर्यंत वाढली, जी ४८.५%ची वाढ आहे. प्रति सेवेतील प्रवासी संख्या देखील २०२५मधील १,४७४वरून २०२६मध्ये १,६६४पर्यंत सुधारली आहे, जे दर्शवते की अधिक सेवा सुरू असूनही गाड्या पूर्ण क्षमतेने धावत आहेत.

या कालावधीत प्रवास केलेल्या एकूण प्रवाशांची संख्या २०२५मधील एक कोटीवरून २०२६मध्ये १.५० कोटी झाली, जी ५०% वाढ आहे. त्यानुसार दैनंदिन सरासरी महसूल २०२५मधील ३८.५० लाखांवरून २०२६मध्ये ५६ लाखांपर्यंत वाढला, तर याच कालावधीतील एकूण महसूल मागील वर्षीच्या ४४.२७ कोटी रुपयांच्या तुलनेत ६४.४० कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

मे २०२५मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कल्याण/बदलापूर/टिटवाळा मेन मार्गावर सेवा सुरू झाल्याने मध्य रेल्वेवरील वातानुकूलित उपनगरी सेवांची संख्या ६६ वरून ८०पर्यंत वाढली.

२६ जानेवारी २०२६पासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस- पनवेल विभागात वातानुकूलित उपनगरी सेवा सुरू झाल्याने वातानुकूलित उपनगरी सेवांची एकूण संख्या ९४ झाली आणि मे २०२६पासून आणखी १४ सेवांची भर पडल्याने मध्य रेल्वेवरील एकूण वातानुकूलित उपनगरी सेवांची संख्या १०८ झाली आहे.

२०२६च्या सर्व महिन्यांमध्ये प्रवाशांची संख्या सातत्यपूर्ण राहिल्याने, जी मार्च आणि मे महिन्यात सर्वाधिक होती, वातानुकूलित उपनगरी सेवांची वाढती मागणी दिसून येते. सुरक्षित, जलद आणि आरामदायी प्रवासाच्या शोधात असलेल्या प्रवाशांनी अतिरिक्त सेवा सुरू करणे आणि नवीन विभागांमध्ये विस्तार करण्याचे स्वागत केले आहे.

उपनगरी प्रवाशांना अधिक आरामदायी आणि उत्कृष्ट प्रवासाचा अनुभव देण्यासाठी मध्य रेल्वेने केलेल्या प्रयत्नांना प्रवाशांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असून मुंबई उपनगरी रेल्वे नेटवर्कमधील प्रीमियम प्रवास सुविधांनाही त्यामुळे अधिक बळ मिळत आहे. सर्वांच्या आरामदायी प्रवासासाठी, मध्य रेल्वे प्रवाशांना वैध तिकीट खरेदी करून निर्धारित डब्यांमधून प्रवास करण्याचे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

# विक्रमी विजयासह गुजरात फायनलमध्ये

## आयपीएल क्वालिफायर २च्या लढतीत राजस्थानची हार

**चंदिगड : वृत्तसंस्था**

शुबमन गिलचे दमदार शतक आणि साई सुदर्शनच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने दिलेल्या विक्रमी धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करत गुजरात टायटन्सच्या संघाने फायनलचे तिकीट पक्के केले. दुसरीकडे मुल्लानपूरच्या मैदानातील पराभवासह युवा बॅटर वैभव सूर्यवंशीसह राजस्थान रॉयल्सचा यंदाच्या हंगामातील प्रवास क्लालिफायर २च्या लढतीतच संपुष्टात आला आहे.



न्यू चंडीगडच्या मुल्लानपूरच्या मैदानात नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खराब झाली. यशस्वी जैस्वाल १(२) आणि ध्रुव जुरेल ७ (६) स्वस्तात माघारी फिरल्यावर वैभव सूर्यवंशीने ४७ चेंडूत आठ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने २०४.२६च्या स्ट्राईक रेटने ९६ धावांची धमाकेदार खेळी केली. रवींद्र जडेजाने ३५ चेंडूत केलेली नाबाद ४५ धावांची खेळी आणि फरेराच्या ११ चेंडूतील ३८ धावांच्या स्फोटक खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सच्या संघाने निर्धारित २० षटकात २१४ धावा केल्या होत्या.

या विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सकडून कर्णधार शुबमन गिल आणि साई सुदर्शन जोडीने संघाला दमदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी १६७ धावांची भागीदारी रचली. साई सुदर्शन सलग दुसऱ्या सामन्यात हिट विकेटच्या रूपात बाद झाला. त्याने ३२ चेंडूत आठ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५८ धावांचे योगदान दिले. दुसऱ्या बाजूला गिलने ५३ चेंडूत १५ चौकार व तीन षटकारांच्या मदतीने १०४ धावांच्या खेळीसह संघाचे फायनलचे तिकीट पक्के करणारी खेळी केली. राहुल तेवतियाने षटकार मारत संघाचा विजय निश्चित केला. त्याने नऊ चेंडूत १७ धावा केल्या. याशिवाय वॉशिंग्टन सुंदरने नऊ चेंडूत १६, तर जोस बटलरने नऊ चेंडूत नाबाद नऊ धावांची खेळी केली.

### आज अंतिम लढत

यंदाच्या आयपीएल हंगामात आता जेतेपदाच्या फैसल्याची घडी उभी ठाकली असून रविवारी (दि. ३१) रोजी झळाळता चषक उंचावण्यासाठी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स संघ आमनेसामने भिडणार आहेत. ही लढत जगातील सर्वात मोठ्या अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवली जाणार आहे.

# शुबमन गिलची ऐतिहासिक कामगिरी!

## प्लेऑफमध्ये एकापेक्षा जास्त शतके झळकावणारा पहिला खेळाडू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या दुसऱ्या क्वालिफायरमध्ये गुजरात टायटन्ससाठी सर्वात मोठ्या सामन्यात कर्णधार शुबमन गिलने महत्त्वपूर्ण खेळी साकारली. गिलने चौकार-षटकारांसह शतकी खेळी साकारत अनेक विक्रम मोडले.

कर्णधार गिलने ५३ चेंडूंमध्ये १०४ धावांची शानदार खेळी साकारली. हे त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील पाचवे शतक होते. या शतकासह गिल हा आयपीएल प्लेऑफ सामन्यांमध्ये एकापेक्षा जास्त शतके झळकावणारा जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. यापूर्वी त्याने अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये आयपीएल २०२३च्या दुसऱ्या क्वालिफायरमध्ये मुंबई इंडियन्सविरुद्ध १२९ धावा केल्या होत्या. ती खेळी आजही आयपीएल प्लेऑफच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या म्हणून कायम आहे.



गिलने अवघ्या ४७ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले, जे आयपीएल प्लेऑफच्या इतिहासातील सर्वात जलद शतक ठरले आहे. त्याने रजत पाटीदारचा विक्रम मोडला, ज्याने २०२२च्या एलिमिनेटरमध्ये लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध ४९ चेंडूंमध्ये शतक झळकावले होते. गिल हा आयपीएल प्लेऑफमध्ये शतक झळकावणारा पहिला कर्णधार ठरला आहे. त्याने प्लेऑफ टप्प्यात कर्णधाराने केलेल्या सर्वोच्च खेळीचा विक्रमही मोडला, जो यापूर्वी डेव्हिड वॉर्नर आणि रजत पाटीदार यांच्या नावावर होता.

गिल आता आयपीएलच्या इतिहासात पाच शतकं झळकावणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. वयाच्या २६ वर्षांपर्यंत कोणत्याही फलंदाजाने तीनपेक्षा जास्त आयपीएल शतके केली नव्हती, पण गिलने हा आकडा पाचवर नेला आहे. तो या हंगामात ७०० धावा पूर्ण करणारा सर्वात तरुण कर्णधारही ठरला आहे. तो आयपीएलच्या एका हंगामात ७०० धावा करणारा दुसरा सर्वात तरुण खेळाडूदेखील आहे, त्याच्या पुढे फक्त त्याचा सहकारी साई सुदर्शन आहे.

आयपीएल प्लेऑफमध्ये ५००हून अधिक धावा करणारा गिल हा पहिला सलामीवीर ठरला आहे. प्लेऑफमधील सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत तो आता ७१४ धावा करणाऱ्या सुरेश रैनाच्या पुढे आहे. गिलने आता ५८१ धावा करून महेंद्रसिंह धोनीला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे.

# साई सुदर्शन-शुबमन गिलचा महाविक्रम; बाबर आझम-रिझवान जोडीला टाकले मागे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या दुसऱ्या क्वालिफायरच्या सामन्यात साई सुदर्शन आणि शुबमन गिल यांनी विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना १६७ धावांची दमदार भागीदारी रचली. आयपीएलच्या इतिहासातील प्लेऑफमधील सर्वोच्च धावसंख्या उभारताना या जोडीने टी-२० जगतात कुणालाही न जमलेला पराक्रम करून दाखवला आहे.

टी-२० क्रिकेटमध्ये कमी डावात सर्वाधिक वेळा शतकी भागीदारी रचण्याचा नवा विश्वविक्रम आता साई-शुबमन जोडीच्या नावे झाला आहे. राजस्थान रॉयल्सविरुद्ध या जोडीने ११व्या वेळी शतकी भागीदारी रचली. यासह टी-२०मध्ये कोणत्याही विकेटसाठी सर्वाधिक वेळा शतकी भागीदारीचा नवा विश्व विक्रम प्रस्थापित झाला. अवघ्या ४८ डावात त्यांनी हा डाव साधला.

टी-२० क्रिकेटमध्ये ख्रिस गेल आणि विराट कोहली या जोडीच्या नावे १० शतकी भागीदारीचा रेकॉर्ड आहे. या दोघांनी यासाठी ६३ वेळा एकत्र बॅटिंग केली होती. साई-शुबमन जोडीने बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान या पाकिस्तानी जोडीच्या विक्रमालाही सुरुंग लावला. या दोघांनी ७५ डावात १० वेळा शतकी भागीदारीचा विक्रम नोंदवला होता.

सर्वाधिक शतकी भागीदारी करणाऱ्या जोड्यांमध्ये विराट कोहली आणि एबी डिव्हिलियर्स यांचेही नाव आहे. आरसीबीकडून या जोडीने ७७ डावात १० वेळा शतकी भागीदारी रचली आहे.

# आठ अर्धशतकांसह साई सुदर्शनने केली विराट कोहलीशी बरोबरी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल स्पर्धेतील क्वालिफायर २चा सामना राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात गुजरात टायटन्सने एकतर्फी विजयाची नोंद केली. यासह आयपीएल २०२६ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात कर्णधार शुबमन गिलने दमदार शतकी खेळी केली. त्याला चांगली साथ देत साई सुदर्शनने अर्धशतकी खेळी केली. या अर्धशतकासह सुदर्शनने आयपीएल स्पर्धेत विराट कोहलीच्या मोठ्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे.

न्यू चंदिगडमध्ये पार पडलेल्या या सामन्यात गुजरात टायटन्सचा संघ २१५ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. त्यामुळे गुजरात टायटन्सला चांगल्या सुरुवातीची गरज होती. साई सुदर्शनने गिलसोबत मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. यादरम्यान त्याने ३२ चेंडूत ५८ धावा केल्या. यात आठ चौकार आणि एक षटकाराचा समावेश होता. या



खेळीच्या बळावर गुजरातला जशी सुरुवात हवी होती, तशी सुरुवात मिळाली.

साई सुदर्शनचे हे या हंगामातील आठवे अर्धशतक ठरले आहे. यासह त्याने आयपीएल स्पर्धेतील एकाच हंगामात सर्वाधिक अर्धशतके झळकावण्याच्या रेकॉर्डमध्ये विराट कोहलीच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. याआधी विराटने आयपीएल २०२५ स्पर्धेत फलंदाजी करताना आठ अर्धशतके झळकावली होती. यासह केन विलियम्सनने २०१८मध्ये आणि फाफ डू प्लेसिसने २०२३मध्ये एकाच हंगामात आठ अर्धशतके झळकावलेली आहेत.

या हंगामात साई सुदर्शनने दमदार कामगिरी केली असून १६ सामन्यांमध्ये आठ अर्धशतके आणि एक शतक झळकावले आहे. विराट आणि साई सुदर्शनला वगळता इतर कुठल्याही फलंदाजाला एकाच हंगामात आठ अर्धशतके झळकावता आलेले नाही. विशेष म्हणजे गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु या दोन्ही संघांमध्ये अंतिम सामन्याचा थरार रंगणार आहे.

आयपीएल स्पर्धेतील एकाच हंगामात सर्वाधिक अर्धशतकं झळकावण्याचा रेकॉर्ड हा सनरायझर्स हैदराबादचा माजी फलंदाज डेव्हिड वॉर्नरच्या नावावर आहे. वॉर्नरने २०१६मध्ये झालेल्या हंगामात नऊ अर्धशतके झळकावली होती.

# राजस्थानच्या पराभवानंतर वैभव सूर्यवंशीला अश्रू अनावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील १९वा हंगाम १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीनं गाजवला, पण न्यू चंदिगड येथील मुल्लानपूरच्या मैदानातील क्वालिफायर २च्या सामन्यात संकटमोचक होऊन त्याने ९६ धावांची खेळी केली. आधी शतक हुकले अन् शेवटी गुजरात टायटन्सच्या संघाने सात विकेट्सने पराभूत करत राजस्थानचे फायनलचे स्वप्न धुळीस मिळवत त्याची खेळी व्यर्थ ठरवली. संघाच्या पराभवानंतर वैभव सूर्यंवशीला भावूक झाला. त्याला अश्रू अनावर झाल्याचे पहायला मिळाले.

क्वालिफायर २च्या लढतीत नाणेफेक जिंकून राजस्थानचा कर्णधार रियान पराग याने पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यशस्वी जैस्वाल आणि ध्रुव जुरेल स्वस्तात माघारी फिरल्यावर वैभव सूर्यवंशी याने पुन्हा एकदा कमालीची खेळी करत ४७ चेंडूत ९६ धावांची खेळी साकारली. त्याचे शतक अवघ्या चार धावांनी हुकले. ध्येय साध्य न झाल्यामुळे तो खूपच भावूक झाला. संघाच्या पराभवानंतर डगआउटमधील वैभवचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.



### 'आम्हाला माफ करा'

आयपीएल फायनलमध्ये प्रवेश करण्याची संधी हुकल्यानंतर वैभव सूर्यवंशीने इन्स्टाग्राम अकाऊंटवरून स्टोरी शेअर करून मनातील भावना व्यक्त केल्या. वैभवने लिहिले की, मला अजूनही विश्वास बसत नाहीये, २० षटकात सर्वकाही कसं बदलू शकतं. आजची रात्री खूप दुःख देणारी आहे. शुबमन गिल आणि गुजरात टायटन्सला विजयाचं श्रेय द्यायला हवं, त्यांनी खरच चांगला खेळ केला. वैभवने पुढे लिहिले की, मी सर्वांचे आभार मानतो, ज्यांनी या युवा खेळाडूंच्या संघावर विश्वास दाखवला, आमच्यासोबत उभे राहिले आणि सर्व १६ सामन्यांमध्ये आम्हाला पाठिंबा दिला. आमच्याकडे आभार मानायला शब्द नाहीत. आम्हाला माफ करा. आम्ही तुम्हाला निराश केलं.

# सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक-चिराग जोडी उपांत्य फेरीत

**सिंगापूर : वृत्तसंस्था**

भारताच्या पीव्ही सिंधूला जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या आन से यंगकडून सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ७५० दर्जा) उपांत्यपूर्व फेरीत पराभूत व्हावे लागले. पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने उपांत्य फेरीत स्थान मिळवले.

दोन ऑलिम्पिक पदक विजेत्या सिंधूला कोरियाच्या यंगविरुद्ध दबावाखाली चांगला खेळ करता आला नाही. त्यामुळे सिंधूला १७-२१, १४-२१ असे पराभूत व्हावे लागले. सामन्याच्या सुरुवातीपासूनच यंगने सिंधूला

### सिंधू, लक्ष्यचे आव्हान संपुष्टात



पुनरागमन करण्याची फारशी संधी दिली नाही. महिला एकेरीत लक्ष्यला चुरशीच्या लढतीत जपानच्या कोकी वातानाबेकडून १९-२१, २१-१५, १५-२१ अशी हार पत्करावी लागली.

पुरुष दुहेरीत भारताच्या चौथ्या मानांकित आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील विजेत्या सात्विक-चिराग जोडीने मलेशियाच्या खाइ झिंग कांग आणि आरोन ताइ जोडीला १९-२१, २१-१७, २१-१३ असे पराभूत केले. उपांत्य फेरीत भारताच्या जोडीसमोर अग्रमानांकित किम वोन हो आणि सेऊ सेऊंग जाए जोडीचे आव्हान असेल.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला व तनिषा क्रॅस्टो जोडीला उपांत्य फेरीत चाल मिळाली. उपांत्यपूर्व सामन्याच्या पहिल्या गेममध्ये तिसऱ्या मानांकित शेन टांग जीए आणि तो ए वेई जोडीने माघारू घेतली. भारतीय जोडीची गाठ जपानच्या युइची शिमोगामी आणि सयाका होबाराशी होईल.

# इशान किशनची दिलदारी! साकिब हुसैनला दिले स्पाईक शूज

**हैदराबाद : वृत्तसंस्था**


सनरायझर्स हैदराबादचा संघ एलिमिनेटर सामन्यातील पराभवानंतर स्पर्धेबाहेर झाला, पण या हंगामात हैदराबाद संघाला दोन उत्कृष्ट गोलंदाज मिळाले, ते म्हणजे साकिब हुसैन व प्रफुल्ल हिंगे. दोन्ही गोलंदाजांनी पदार्पणाच्या सामन्यात आणि नंतर उर्वरित हंगामात आपल्या कौशल्याची छाप पाडली. दरम्यान, साकिब हुसैनने स्पर्धेतनंतर इशान किशनबाबत मोठा खुलासा केला आहे.

हैदराबादने साकिब हुसैनला ३० लाख रुपयांना संघात घेतले आणि संघातील वरिष्ठ खेळाडू दुखापतग्रस्त असताना त्याला संधी देण्यात आली. साकिबने १३ एप्रिल रोजी राजस्थान रॉयल्सविरुद्ध पदार्पण केले आणि आपल्या पहिल्याच सामन्यात चार बळी घेतले. त्याच्या आयुष्यातील संघर्षाबद्दल चर्चा सुरू झाली असताना, एक जुना व्हिडीओ समोर आला, ज्यामध्ये त्याने सांगितले होते की त्याच्या



आईने त्याला स्पाइक शूज विकत घेण्यासाठी आपले दागिने विकले होते.

आता साकिब हुसैनने खुलासा केला आहे की, इशान किशनने त्याला या सीझनमध्ये स्पाइक शूजच्या सहा जोड्या गिफ्ट म्हणून दिल्या आहेत. ईएसपीएनक्रिकइन्फोला दिलेल्या एका मुलाखतीत साकिब हुसेनने खुलासा केला की, इशान किशनने त्याला स्पाइक शूजच्या सहा जोड्या भेट म्हणून दिल्या होत्या. २०१४मध्ये कोलकाता नाईट रायडर्सने साकिब हुसैनला संघात घेतले, पण त्याला पदार्पण करता आले नव्हते.



दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com